नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५१ * अंक १५१ * * अमरावती * गुरुवार, दिनांक ४ डिसेंबर २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## दिल्ली मनपा पोटनिवडणुकीत भाजपला नुकसान

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ३ :
दिल्ली महानगरपालिकेच्या १२ प्रभागांच्या पोटनिवडणुकांचे निकाल आले आहेत. भाजपने ७, आम आदमी पार्टीने ३ आणि कॉंग्रेस-ऑल इंडिया फॉरवर्ड ब्लॉकने प्रत्येकी एका जागेवर विजय मिळवला आहे. यापूर्वी १२ प्रभागांपैकी ९ भाजप आणि ३ आपकडे होते.
दिल्लीत भाजप सरकार स्थापन झाल्यानंतर झालेल्या या पहिल्या निवडणुकीत पक्षाला २ जागांचे नुकसान झाले आहे. तर, कॉंग्रेसला आपले खाते उघडण्यात यश आले आहे. भाजपने ज्या प्रभागांमध्ये विजय मिळवला त्यात द्वारका-बी, अशोक विहार, ग्रेटर कैलाश, दिचाऊं कलां, शालीमार बाग-बी, विनोद नगर आणि चांदनी चौक यांचा समावेश आहे.

अग्राग्रलेख
## खरीखरी..

## सामान्यजन विरुद्ध महाजन

नाशिक मधील आगामी कुंभमेळ्याचे प्रमुख म्हणून जळगावच्या महाजन साहेबांची नेमणूक झालेली आहे. कुंभमेळा आपल्या देशात दर तीन वर्षांनी भरविण्यात येतो. त्याच्या तयारीबाबत याच स्तंभातून आम्ही मनापासून चिंता व्यक्त केली होती. आता कुंभमेळ्याच्या तयारीसाठी तपोवनातील ८०० हून अधिक झाडांची चिता रचण्याचे कार्य करण्यात येणार आहे. या वृक्षतोडीच्या विरोधात नाशिकची सामान्य जनता महाजन साहेबांना विनंती करीत आहे की नाशिकचे हे वृक्ष वैभव आपण नष्ट करू नये. तपोवनात जी झाडे आहेत त्यापैकी बरीचशी झाडे शतायुषी आहेत हे या ठिकाणी नमूद करणे गरजेचे आहे. वृक्षवल्ली आम्हा सोयरे, असे म्हणत आपण ज्या झाडांची पूजा करतो असे वड, पिंपळ आणि कडुनिंब यासारखी झाडे या कत्तलीमध्ये तुटणार आहेत. ज्या झाडांच्या फळांचा उपयोग आपल्या खाद्य पदार्थांमध्ये होतो असे आंबा, चिंच, चेरी यासारखी इतरही झाडे याच तपोवनात आपली फळे समृद्धपणे देत आहेत. थोडक्यात हे तपोवन विविध प्रकारच्या वृक्षांचे अभयवन आहे. नाशिक मध्ये या वृक्षतोडी विषयी जी जन सुनावणी झाली. त्यामध्ये या वृक्षतोडीचा घनघोर विरोध करण्यात आला. मात्र आतापर्यंतचा अनुभव असा आहे की आपल्या राज्यातील महाजनांनी म्हणजेच प्रभावी लोकांनी एकदा जर काही ठरवले. तर त्याचा कितीही विरोध झाला तरी त्याची तमा असे प्रभावी महाजन बाळगीत नाहीत. मुंबईच्या जनतेने आरेला कारेकारे म्हणून विरोध करूनही आरेवर अनेक आऱ्या चालवण्यात आल्या. त्यामुळे येथील दुर्मिळ पक्षीही आता दिसेनासे झालेले आहेत. हा इतिहास काही फार जुना नाही नाशिकमध्ये येणाऱ्या साधुसंतांची व्यवस्था साधू ग्राम म्हणणाऱ्या तपोवनतच करू नये तर तपोवनशिवाय कुठे करावी, असा वृक्षसंहारी समर्थकांचा दावा आहे. हा कावा मोडून काढण्यासाठी आता काही राजकीय, बरेचसे पर्यावरण प्रेमी, त्यांच्यासोबत सामाजिक जाणीव ठेवणारी मंडळी आणि चित्रपट सृष्टीतील सयाजी शिंदे यांच्यासारखे वृक्षप्रेमी अभिनेते दंड थोपटून उभे राहिलेले आहेत. आगामी कुंभमेळ्यात चार-पाच लाख साधुसंत येणार आहेत. साधुसंत वाढल्यामुळे त्यांच्या नेहमीच्या निवासाची जागा कमी पडत आहे ही कमतरता भरून काढण्यासाठी एकमात्र पर्याय म्हणजे ही वृक्षतोडच आहे असे वृक्षतोड समर्थकांना वाटते. १८०० झाडे तोडून १८००० झाडे लावण्याचा महाजन साहेबांचा दावा हल्ली हास्यास्पद ठरत आहे. कारण त्यासाठी उदाहरण द्यायचे तर, एका २४ वर्षांच्या मुलीची बरोबरी दोन वर्षाच्या बारा मुली करतील काय? हा आमचा अति प्राचीन सवाल आहे. श्रीराम, सीता आणि लक्ष्मण पंचवटीच्या छायेतच राहिले होते. लक्ष्मणाने शूर्पणखेचे नाक आणि कान इथेच कापले होते. त्यामुळे तपोवनाला अशा प्रकारच्या कापाकापी चा इतिहास आहे असे समजून या वृक्षांची कापाकापी होत आहे काय, असाही प्रश्न आमच्या निरपराध मनामध्ये उभा राहिला आहे. नाशिक शहर महाराष्ट्रातील पर्यावरणाच्या दृष्टीने सर्वाधिक उत्तम शहर आहे असे म्हणतात. अशा उत्तम शहराला वृक्षतोड करून ऑक्सिजन विहीन केल्यावर कुंभमेळ्याचे पुण्य मिळेल काय, हा तर फारच मोठा यक्षप्रश्न आहे. पण झाडांची ही कत्तल थांबेल की नाही याबद्दलही आता शंका वाटू लागली आहे. बड्याबड्या रस्त्यांच्या उभारणीसाठी अनेकदा बडीबडी झाडे कापण्यात आलेली आहेत. यामुळे आपले पर्यावरण पार बिघडलेले आहे. त्याच कारणास्तव नाशिककर जीवावर उदार होऊन या वृक्षतोडी विरुद्ध जन चळवळ उभी करीत आहेत. या जन चळवळीचा आवाज जळगावच्या महाजन साहेबांनी मुंबई, दिल्ली पर्यंत पोहोचवला पाहिजे त्यासाठी त्यांनी जनतेचे ऐकले पाहिजे. महाजन साहेबांना सामान्य जनांच्या वतीने प्रणिपात करून तपोवनातील ही झाडे वाचवण्याचे आवाहन महासागर करीत आहे. त्यासाठी 'घालीतो लोटांगण आणि करितो वंदन' याशिवाय आम्ही काय करू शकतो.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## पार्थ पवार जमीन घोटाळ्यात पहिली विकेट
# शीतल तेजवानीला अटक

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. ३ :
पुण्यातील पार्थ पवार यांच्याशी संबंधित मुंढवा कोट्यवधी रुपयांच्या वादग्रस्त जमीन व्यवहार प्रकरणातील मुख्य सूत्रधार शीतल किसनचंद तेजवानी हिला गुन्हे शाखेकडून अटक करण्यात आली आहे.
या प्रकरणात उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे सुपुत्र पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीचे नाव समोर आल्याने हे प्रकरण राज्यभर गाजले होते. शीतल तेजवानी परदेशात पळून गेल्याची चर्चा असतानाच तिला बेड्या ठोकल्याने तपासाला वेग येणार आहे..
मुंढवा येथील जमिनीच्या व्यवहारात शासनाची मोठी फसवणूक झाल्याचे प्रकरण समोर आले होते. या व्यवहारात शीतल तेजवानीने महत्त्वाची भूमिका बजावल्याचा संशय आहे. या गुन्ह्याचा तपास करत असताना पोलिसांना शीतल तेजवानी हिचा मुख्य सहभाग असल्याचे धागेदोरे मिळाले होते.
पोलिसांनी यापूर्वी तिला दोन वेळा





चौकशीसाठी बोलावले होते. या चौकशीदरम्यान मिळालेली माहिती आणि कागदपत्रांच्या पडताळणीनंतर तिचा गुन्ह्यातील थेट सहभाग स्पष्ट झाला. त्यानंतर गुन्हे शाखेने तत्काळ कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करत तिला अटक केली.
शीतल तेजवानी या प्रकरणातील कारवाई टाळण्यासाठी देश सोडून परदेशात पळून गेल्याची जोरदार चर्चा गेल्या काही दिवसांपासून पुणे शहरात सुरू होती. मात्र, पुणे पोलिसांनी तिला अटक करून या चर्चांना पूर्णविराम दिला आहे. आता पोलीस कोठडीत तिच्याकडून या घोटाळ्याशी संबंधित आणखी कोणती माहिती समोर येते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.
मुंढवा येथील तब्बल १८०० कोटी रुपये बाजारभाव असलेली ही जमीन केवळ ३०० कोटी रुपयांना खरेदी करण्यात आल्याचे समोर आले होते. विशेष म्हणजे, या व्यवहारासाठी स्टॅम्प ड्युटी म्हणून अवघे ५०० रुपये मोजण्यात आले होते. पार्थ पवार यांच्या 'अमेडिया' कंपनीसाठी हा व्यवहार झाल्याचा आरोप आहे.
विशेष म्हणजे, ज्या कंपनीचे भांडवल केवळ एक लाख रुपये आहे, ती कंपनी तीनशे कोटींचा व्यवहार कसा करू शकते, असा सवाल विरोधकांनी उपस्थित केला होता. प्रशासकीय पातळीवरही या व्यवहाराला प्रचंड गती देण्यात आली होती. उद्योग संचालनालयाने केवळ 48 तासांत स्टॅम्प ड्युटी माफ केली होती आणि अवघ्या २७ दिवसांत हा संपूर्ण व्यवहार पूर्ण करण्यात आला होता.

## सदानंद दाते होणार नवे पोलीस महासंचालक

रश्मी शुक्ला ३१ डिसेंबर रोजी होणार सेवानिवृत्त

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ३ :



वरिष्ठ पोलिस अधिकारी सदानंद दाते यांची महाराष्ट्राच्या पोलिस महासंचालकपदी निवड झाली आहे. राज्याच्या विद्यमान पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला येत्या ३१ डिसेंबर रोजी आपल्या पदावरून निवृत्त होणार आहेत. त्यानंतर दाते त्यांची जागा घेतली. ते डिसेंबर २०२६ पर्यंत आपल्या पदावर कायम राहतील.
राज्याचे नवे पोलिस महासंचालक म्हणून सदानंद दाते यांची निवड करण्यात आली आहे. राज्याच्या गृह खात्याने या प्रकरणी ७ उच्चपदस्थ पोलिस अधिकाऱ्यांची नावे केंद्रीय लोकसेवा आयोगाकडे पाठवली होती. त्यात दाते यांचे नाव अग्रस्थानी होते. अखेर अपेक्षेनुसार त्यांच्याच नावाची राज्याचे नवे पोलिस महासंचालक म्हणून निवड झाली आहे. त्याची केवळ औपचारिक घोषणा बाकी आहे.
सदानंद दाते हे १९९० च्या आयपीएस बॅचचे अधिकारी आहेत. ते कडक शिस्तीचे व कर्तव्यनिष्ठ अधिकारी म्हणून ओळखले जातात. त्यांनी आतापर्यंत आर्थिक गुन्हे शाखा, सायबर गुन्हेगारी, रेल्वे पोलिस, नवी मुंबईचे पोलिस अधीक्षक आदी विविध पदांवर काम केले आहे.
सध्या ते एनआयएचे महासंचालक आहेत. त्यांच्या नेतृत्वात ब्लॅक कॅट कमांडोंनी विविध मोहिमा यशस्वीपणे राबवल्या आहेत. उल्लेखनीय बाब म्हणजे सदानंद दाते यांनी मुंबईवरील २६/११ च्या हल्ल्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती. त्यावेळी ते मुंबई क्राईम ब्रॅन्चमध्ये कार्यरत होते. मुंबईच्या कामा रुग्णालयात २ अतिरेकी घुसले तेव्हा दाते यांनी मोजक्या पोलिसांच्या मदतीने त्यांचा सामना केला होता. त्यांच्या सतर्कतेमुळेच कामा रुग्णालयातून ओलिसांना सुरक्षितपणे पळून जाता आले होते. या कारवाईत दाते यांना अतिरेक्यांच्या २ गोळ्याही लागल्या होत्या. अशा धाडसी अधिकाऱ्यावर आता संपूर्ण महाराष्ट्राच्या सुरक्षेची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.
राज्य सरकारने यूपीएससीला ज्या ७ आयपीएस अधिकाऱ्यांची नावे पाठवली होती, त्यात एनआयए प्रमुख सदानंद दाते, डीजीपी (कायदा व तांत्रिक) संजय वर्मा, होमगार्ड्सचे कमांडंट जनरल रितेश कुमार, डीजीपी (लाचलुचपत प्रतिबंधक विभाग) संजीव कुमार सिंघल, महासंचालक (राज्य पोलिस गृहनिर्माण आणि कल्याण महामंडळ) अर्चना त्यागी, नागरी सुरक्षा महासंचालक संजीव कुमार आणि महासंचालक (सरकारी रेल्वे पोलिस) प्रशांत बर्डे यांचा समावेश होता. त्यात दाते यांनी बाजी मारली.

## शेतकऱ्यांच्या मदतीचा प्रस्ताव
## केंद्राला पाठवलाच नाही?



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ३ :
महाराष्ट्रातील अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या मदतीचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.
केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी संसदेत महाराष्ट्र सरकारकडून मदतीच्या मागणीसाठी अद्याप कोणताही अहवाल मिळाला नसल्याचे सांगितले आहे. त्यावर मुख्यमंत्र्यांनी अहवाल यापूर्वीच पाठवल्याचा दावा केला आहे. यामुळे केंद्राला मदतीचा अहवाल पाठवला की नाही? याविषयी संभ्रमावस्था निर्माण झाली आहे.
फडणवीस या प्रकरणी बुधवारी पत्रकारांशी स्थिती स्पष्ट करताना म्हणाले, संसदेतील प्रश्नोत्तरांची प्रक्रिया ही ३५ दिवस आधीच्या माहितीवर आधारित असते. त्यामुळे मंत्र्यांचे उत्तर त्यावेळच्या स्थितीनुसार असू शकते. प्रत्यक्षात राज्य सरकारने आपला अहवाल यापूर्वीच केंद्राकडे सुपूर्द केला आहे. केंद्रीय पथकाने दोन वेळा राज्याचा दौरा करून पाहणी केली आहे. त्यांचा अहवालही सादर झाला आहे, असे फडणवीस यांनी सांगितले.
दुसरीकडे, विरोधी पक्षांनी मात्र या विषयावरून राज्य सरकारवर गंभीर टीका केली आहे. शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यावरून राज्य सरकार गंभीर नाही, मदत देण्याची त्यांची मानसिकता नाही, हे सरकार शेतकरी विरोधी असल्याची टीका विरोधकांनी केली आहे.

## देशातील बहुजनांसोबत उघड विश्वासघात

केंद्राच्या जात जनगणनेच्या नियोजनावर राहुल गांधींचे प्रश्नचिन्ह

■ वृत्तसंस्था
नवी दिल्ली, दि. ३ :



संसदेत मी सरकारला जात जनगणनेबद्दल प्रश्न विचारला, त्यांचे उत्तर धक्कादायक आहे. ना कोणती ठोस रूपरेषा, ना वेळेनुसार योजना, ना संसदेत चर्चा, आणि ना जनतेशी संवाद, असे राहुल गांधी यांनी म्हटले आहे.
इतर राज्यांच्या यशस्वी जात जनगणनेच्या रणनीतीतून शिकण्याची कोणतीही इच्छा नाही. मोदी सरकारची ही जात जनगणना देशातील बहुजनांसोबत उघड विश्वासघात आहे.
राहुल गांधींनी यासोबतच संसदेत विचारलेल्या प्रश्नाची सॉफ्ट कॉपी शेअर केली आहे. यात राहुल गांधींचा प्रश्न आणि त्यावर केंद्र सरकारने दिलेले उत्तर लिहिलेले आहे.
दशवार्षिक जनगणनेच्या तयारीमध्ये कोणती मुख्य पाऊले समाविष्ट असतात? यासह काही प्रश्न त्यांनी विचारले आहेत. त्यावर त्यांनी हा आरोप केला आहे.

## छत्तीसगडमध्ये १२ नक्षलवादी ठार, ३ जवान शहीद

■ वृत्तसंस्था, बीजापूर, दि. ३ :
छत्तीसगडमध्ये दंतेवाडा-बीजापूर सीमेवर जवानांनी १२ नक्षलवाद्यांना ठार केले आहे. सर्व मृतदेह ताब्यात घेण्यात आले आहेत. ठार झालेल्या नक्षलवाद्यांची संख्या वाढू शकते. याचवेळी, चकमकीत डीआरजीचे ३ जवान शहीद झाले असून २ जखमी झाले आहेत. बस्तर रेंजचे आयजी सुंदरराज पी. यांनी याची पुष्टी केली आहे.
सुंदरराज पी. यांनी सांगितले की, चकमकीत बीजापूर डीआरजीचे जवान हेड कॉन्स्टेबल मोनू वडारी, रमेश सोडी आणि कॉन्स्टेबल दुकारू गोंडे शहीद झाले. गंगालूर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील जंगलात जवानांचे पथक सतत शोधमोहीम राबवत आहे.
एसपी जितेंद्र यादव यांनी सांगितले की, संयुक्त पथकाने बुधवारी सकाळी ९ वाजल्यापासून बीजापूर-दंतेवाडा सीमेवरील वेस्ट बस्तर डिव्हिजन परिसरात शोधमोहीम सुरू केली होती. जंगलात शोधमोहीम सुरू असताना नक्षलवाद्यांनी अचानक गोळीबार सुरू केला. प्रत्युत्तरादाखल केलेल्या कारवाईत नक्षलवादी ठार झाले.
मुख्यमंत्री विष्णुदेव साय यांनी म्हटले आहे की, आपल्या जवानांचे बलिदान व्यर्थ जाणार नाही. शूर जवानांना मी विनम्र श्रद्धांजली अर्पण करतो. गृहमंत्री विजय शर्मा यांनी सांगितले की, आज आपल्या शूर जवानांच्या शौर्याने इतिहास लिहिला जात आहे. नक्षलवाद अखेरच्या घटका मोजत आहे. त्यांनी शहीद सैनिकांना श्रद्धांजलीही वाहिली.
छत्तीसगडमध्ये ४ दिवसांपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्री अमित शाह आणि एनएसए डोवाल यांच्यासह अनेक मान्यवर डीजीपी परिषदेत सहभागी झाले होते. या बैठकीत नक्षलवाद संपवण्यासाठीच्या रणनीतीवर चर्चा करण्यात आली होती. आता त्याचे परिणाम दिसत आहेत.

**रायफल आणि दारूगोळाही जप्त**

एसपींनी सांगितले की, जवानांनी चकमकीच्या ठिकाणाहून एसएलआर, ३०३ रायफल आणि दारूगोळाही जप्त केला आहे. ठार झालेल्या नक्षलवाद्यांची ओळख पटवली जात आहे.

## निवडणूक प्रक्रियेत कोर्टाचा हस्तक्षेप अयोग्य

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :
राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा आज जाहीर होणारा निकाल मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने अचानक पुढे ढकलल्याने मोठा राजकीय गदारोळ निर्माण झाला आहे.



न्यायालयाच्या या निर्णयावर वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी अत्यंत तीव्र शब्दांत आक्षेप नोंदवला आहे. ₹निवडणूक प्रक्रियेत हस्तक्षेप करण्याचा अधिकार कोणत्याही न्यायालयाला नाही, त्यामुळे नागपूर खंडपीठाचा हा निर्णय पूर्णपणे चुकीचा आणि असंवैधानिक आहे, असे म्हणत प्रकाश आंबेडकर यांनी या निर्णयाला थेट आव्हान दिले आहे.
आंबेडकर म्हणाले की, ₹नागपूर खंडपीठाचा हा निर्णय पूर्णपणे चुकीचा आहे. एकदा निवडणूक प्रक्रिया सुरू झाली की, संविधानानुसार कोणत्याही न्यायालयाला त्यात हस्तक्षेप करण्याचा अधिकार नसतो. उच्च न्यायालय निकाल कसा काय थांबवू शकते? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. या प्रकरणात सरन्यायाधिशांनी हस्तक्षेप करण्याची मागणीही त्यांनी केली.

## अनेक विमानतळांवर चेक-इन प्रणालीत अडचण

■ वृत्तसंस्था
बंगळुरू, दि. ३ :

बंगळूरुमध्ये ४२ विमानांची उड्डाणे रद्द

देशातील अनेक विमानतळांवर बुधवार सकाळपासून चेक-इन प्रणालीमध्ये समस्या येत आहे. यामुळे विमान उड्डाणांवर परिणाम झाला आहे.
बंगळुरू विमानतळावर ४२ विमानांची उड्डाणे रद्द करावी लागली. तर, हैदराबाद विमानतळावर मोठी गर्दी जमली होती. दिल्लीत चेक-इन प्रक्रिया मॅन्युअल करण्यात आली आहे.
वाराणसी विमानतळावर प्रवाशांना सांगण्यात आले की, मायक्रोसॉफ्ट विंडोजने जगभरात मोठ्या सेवा खंडित झाल्याची (आउटेज) नोंद केली आहे. यामुळे विमानतळावरील आयटी सेवांवर परिणाम झाला आहे.
तथापि, मायक्रोसॉफ्टने ही बातमी खोटी असल्याचे म्हटले आहे. कंपनीने सांगितले की, विंडोजवर कोणतीही तांत्रिक समस्या आलेली नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

## राऊत, फडणवीस यांच्यात १५ मिनिटे चर्चा



राजकीय चर्चांना ऊत

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ३ :
महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात सध्या अनेक घडामोडी घडत असताना, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांची अनपेक्षित भेट झाल्याने नवे राजकीय संकेत मिळत आहेत.
संजय राऊत यांचे व्याही राजेश नार्वेकर यांच्या मुलाच्या विवाहसोहळ्याला काल अनेक प्रतिष्ठित राजकीय नेते उपस्थित होते. त्यात देवेंद्र फडणवीस, मुंबई भाजपचे अध्यक्ष आशिष शेलार आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचादेखील समावेश होता.
याच विवाहसोहळ्यात संजय राऊत आणि देवेंद्र फडणवीस यांची समोरासमोर भेट झाली. या भेटीत दोन्ही नेत्यांनी जवळपास १५ मिनिटे संवाद साधल्याचे सूत्रांकडून समजते. त्यामुळे ही भेट राजकीय दृष्टीने महत्त्वपूर्ण मानली जाते.

## राज्य विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन केवळ एक आठवड्याचे

विधानसभा आणि विधानपरिषद विधिमंडळ कामकाज सल्लागार समिती बैठकीत निर्णय

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३ :
महाराष्ट्र विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन सोमवार ८ ते रविवार दि. १४ डिसेंबर २०२५ या कालावधीत नागपूरमध्ये होणार आहे. दि. १३ डिसेंबर शनिवार आणि दि. १४ डिसेंबर रविवार शासकीय सुट्टीच्या दिवशीही दोन्ही सभागृहाचे कामकाज घेण्याचा निर्णय विधिमंडळ कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत घेण्यात आला आहे.
विधानभवन येथे विधिमंडळ कामकाज सल्लागार समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती.बैठकीला विधान परिषद सभापती प्रा.राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, विधानपरिषद उपसभापती डॉ.नीलम गो?हे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, उच्च व तंत्र शिक्षण व संसदीय कार्यमंत्री चंद्रकांतदादा पाटील, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे,जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील, सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार, विधानसभा सदस्य सर्वश्री सुधीर मुनगंटीवार,दीपक केसरकर, जितेंद्र आव्हाड, भास्कर जाधव, सुनील प्रभू,अमीन पटेल विधानपरिषद सदस्य अनिल परब,



प्रसाद लाड, प्रवीण दरेकर, विक्रम काळे, सतेज पाटील, विधिमंडळाचे सचिव जितेंद्र भोळे संबंधित अधिकारी उपस्थित होते.
भारताच्या संविधानाची गौरवशाली अमृत महोत्सवी वाटचालह्व या ऐतिहासिक पर्वानिमित्त दिनांक २६ मार्च २०२५ रोजी विधानसभेत भारताच्या संविधानाची गौरवशाली अमृत महोत्सवी वाटचाल' या विषयावर सभागृहात चर्चा झाली होती.
या वेळी झालेल्या चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या भाषणाचे पुस्तक स्वरूपातील संकलन महाराष्ट्र विधिमंडळ वि.स. पांगे संसदीय प्रशिक्षण केंद्राच्या पुढाकारातून करण्यात आले आहे. हा पुस्तक प्रकाशन सोहळा मंगळवार दिनांक ९ डिसेंबर रोजी राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात येणार आहे असे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी बैठकीत सांगितले.

## राज ठाकरे २० वर्षांनंतर संजय राऊतांच्या घरी

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज शिवसेना (ठाकरे गट) खासदार संजय राऊत यांची त्यांच्या भांडूप येथील निवासस्थानी जाऊन सदिच्छा भेट घेतली. विशेष म्हणजे, तब्बल २० वर्षांनंतर राज ठाकरे राऊतांच्या घरी आल्याने या भेटीला वेगळे महत्त्व प्राप्त झाले आहे.



यावेळी राज ठाकरेंनी राऊतांच्या प्रकृतीची आस्थेने विचारपूस करत त्यांना काही काळ सक्तीची विश्रांती घेण्याचा सल्ला दिला.
राज ठाकरे यांनी आज दुपारी राऊत यांचे निवासस्थान गाठले. यावेळी दोघांमध्ये साधारण २५ ते ३० मिनिटे चर्चा झाली.

## मत पेट्यांमध्ये फेरफार करण्यासाठी सरकारला १५ दिवस मिळतील



■ **मुंबईः** राज्यातील नगर पालिका आणि नगर पंचायत निवडणुकीसाठी मतदान पार पडले आहे. या निवडणुकीचा निकाल उद्या म्हणजेच ३ डिसेंबरला जाहीर होणार होता. मात्र आता हा निकाल लांबणीवर पडला असून तो २१ डिसेंबरला जाहीर होणार आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने नगरपालिका आणि नगरपरिषदेचे सर्व निकाल २१ डिसेंबरपर्यंत जाहीर करु नका, असे निर्देश दिले आहेत. यावर भाष्य करताना माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण खळबळजनक विधान केले आहे. पृथ्वीराज चव्हाण म्हणाले की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत सर्व सावळा गोंधळ आहे. निवडणूक आयोग किती अक्षमतेने काम करते हे समोर आलेलं आहे. मतमोजणी पुढे ढकलल्यामुळे मतदान पेट्या १५-१६ दिवस गोडाऊन मध्ये राहतील. त्यामध्ये काही घालमेल करायचा असेल तर सरकारला वेळ मिळेल.

पुढे बोलताना चव्हाण म्हणाले की, या सगळ्या प्रक्रियेमुळे निवडणूक प्रक्रियेवरचा विश्वास उडत चालला आहे. सरकार व निवडणूक आयोग एकमेकांवर जबाबदारी ढकलून मोकळे होत आहे. कोर्टात जेव्हा केस सुरू होती तेव्हा सरकारच्या वकिलाने प्रभावीपणे बाजू मांडायला हवी होती. तसे केले असते तर निवडणुका निकाल पुढे गेले नसते ती बाजू मांडण्यात सरकारला अपयश आलं आहे.

## ५० लाखांचे हेरॉईन जप्त



■ **मुंबई :** मुंबई क्राईम ब्रँचच्या अँटी-नार्कोटिक्स सेलने बोरिवली परिसरात कारवाई करत दोन अंमली पदार्थ पुरवठादारांना अटक केली आहे. या दोघांकडून उच्च दर्जाचं हेरॉईन आणि तब्बल ५ लाखांची रोकड जप्त करण्यात आली. जप्त केलेल्या हेरॉईनची आंतरराष्ट्रीय बाजारातील किंमत सुमारे ५० लाख रुपये असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

कळंबोली आणि पनवेल परिसरात राहणाऱ्या आरोपींवर एएनसीच्या कांदिवली युनिटने मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे बोरिवलीत सापळा रचून धडक कारवाई केली. त्यांच्याकडून हेरॉईनचे पॅकेट्स आणि रोकड हस्तगत करण्यात आली.

## महात्मा फुले बायोपिकसंबंधीची सरकारी फाइल गायब

■ **मुंबई :** महात्मा फुले बायोपिकसंबंधीची महत्त्वाची सरकारी फाइल मंत्रालयाच्या ग्राउंड फ्लोअरवरून गायब झाली आहे. या प्रकारानंतर मरीन ड्राइव्ह पोलिसांनी अज्ञात व्यक्तींविरोधात फाइलमध्ये फेरफार केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. ।पासात उघड झालं की संबंधित मूळ फाइलच्या जागी फक्त फोटो कॉपी ठेवण्यात आली होती, तर २०१७ ते २०२० या कालावधीतील नोंदी पूर्णपणे गायब आहेत. त्यामुळे फाइल कोठे गेली, कोणाकडे प्रवेश होता आणि ती मुद्दाम नष्ट करण्यात आली का, याबाबत पोलिसांकडून सखोल तपास सुरू आहे.

दरम्यान, या प्रकरणात गेवराई पोलिसांनी पाचपेक्षा अधिक कलमांखाली ५५ जणांवर गुन्हे नोंदवले आहेत. निवडणूक प्रक्रियेतील शांततेचा भंग, कायदा व सुव्यवस्था धोक्यात आणणे, तसेच हाणामारीचे गुन्हे यांचा समावेश आहे. पोलिसांनी स्वतः फिर्यादी होत गुन्हा दाखल केला असून पंडित आणि पवार गटातील व्यक्ती या दोन्ही बाजूंतील लोकांचा यात समावेश आहे. यामुळे हे प्रकरण आता कायद्याच्या कचाट्यात गेलं असून, राजकारणात या मुद्द्याचा वापर अधिक होण्याची शक्यता राजकीय वतुर्ळात व्यक्त होत आहे.

## बारामतीतील दाम्पत्याचा भीषण अपघात

■ **बारामती :** शिवाजी नगर, बारामती येथील जगताप कुटुंब तिरुपती दर्शनाहून परतत असताना हुबळी राष्ट्रीय महामार्गावर त्यांचा भीषण अपघात झाला. पहाटे साडेचार वाजता पुढे जाणाऱ्या ट्रकने अचानक ब्रेक लावल्यानं त्यांच्या कारची ट्रकला जोरदार धडक बसली. या दुर्घटनेत अनिल जगताप यांचा घटनास्थळी मृत्यू झाला, तर पत्नी वैशाली जगताप आणि मुलगी जखमी असून तिच्यावर उपचार सुरू आहेत.

# पर्यावरण व कुंभमेळा दोन्ही महत्त्वाचे

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नाशिकच्या तपोवणातील वृक्षतोडीला विरोध दर्शवल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या मुद्यावरील आपली भूमिका स्पष्ट केली आहे. नाशिक तपोवनात वृक्षतोड व्हावी असे आमच्यापैकी कुणाचेही मत नाही. या प्रकरणी अधिकाधिक झाडे वाचवण्याचे प्रयत्न केले जातील. आमच्यासाठी पर्यावरण व कुंभमेळा या दोन्ही गोष्टी महत्त्वाच्या आहेत, असे ते म्हणालेत.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी तपोवनातील वृक्षतोडीच्या मुद्यावर अभिनेते सयाजी शिंदे यांच्या भूमिकेचे जोरदार समर्थन केले होते. यामुळे तपोवनातील वृक्षतोडीचे कथित समर्थन करणाऱ्या मंत्री गिरीश महाजन यांची पर्यायाने भाजपची अडचण झाली होती.

या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या सरकारची भूमिका स्पष्ट केली आहे. या प्रकरणी त्यांनी पर्यावरणही महत्त्वाचे आहे आणि कुंभमेळाही महत्त्वाचा आहे, असे सांगत या दोन्ही गोष्टींवर योग्य तो तोडगा काढण्याची ग्वाही दिली आहे.



फडणवीस म्हणाले, कुंभमेळा आपल्या सर्वांसाठीच महत्त्वाचा आहे. त्याचवेळी पर्यावरणही महत्त्वाचे आहेत. झाडेही महत्त्वाची आहेत. मी असेन, एकनाथ शिंदे असतील किंवा अजित पवार असतील, आमच्यापैकी कुणाचेही मत नाही की अशा पद्धतीने झाडे तोडली गेली पाहिजेत. पण एक गोष्ट आपल्याला लक्षात घ्यावी लागेल. प्रयागराजचा कुंभमेळा ज्या ठिकाणी होतो, तिथे १५ हजार हेक्टर जागा आहे. आणि आपला कुंभमेळा ज्या साधूग्रामला शतकानुशतकांपासून होत आहे, तिथे केवळ ३०० ते ३५० एकर जागा आहे.

आपण २०१५ - २०१६ चा गुगल मॅप बघितला तर यापैकी एकही झाड आपल्याला दिसत नाही. ज्यावेळी महाराष्ट्र सरकारने ५० कोटी वृक्ष लावण्याचा कार्यक्रम घेतला, त्यावेळी नाशिक महापालिकेने विचार करून ही झाडे लावली. कारण, ती रिकामी जागा होती. १२ वर्षांत एकदाच आपण ती जागा वापरतो.

आत्ता ज्यावेळी त्या ठिकाणी साधूग्राम तयार करण्याचा विचार झाला तेव्हा तिथे झाडे दिसून आली. घनदाट झाडांमुळे तिथे साधूग्राम तयार करता येत नाही. त्यामुळे आत्ता हा प्रश्न निर्माण झाला आहे. या प्रकरणी योग्य तो मार्ग काढून कमीत कमी झाडे कापण्याचा किंवा कापूच नयेत अथवा दुसरीकडे लावण्याचा, अधिकाधिक झाडे वाचवावीत, अजून काही पर्याय आहेत का? या सगळ्या गोष्टींचा विचार केला जात आहे, असे ते म्हणालेत.

**बोगस पर्यावरणवाद्यांवर निशाणा**

देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी या प्रकरणी विनाकारण राजकारण करणाऱ्यांचाही समाचार घेतला. या प्रकरणी काही लोकांनी विनाकारण अ‍ॅक्टिव्हिझम सुरू केले आहे. काही लोकं पर्यावरणवादी बनले आहेत. मला पर्यावरणवाद्यांचा आदर आहे. पण काही लोकं राजकीय कारणांनी पर्यावरणवादी बनलेत.

त्यांना माझे एवढेच म्हणणे आहे की, कुंभमेळा हा निसगार्शीच साधर्म्य साधणाराच आपल्या संस्कृतीचे एक प्रतिक आहे. त्यामुळे यातून आम्ही अशा प्रकारचा मार्ग काढू की, ज्यातून पर्यावरणाचाही ऱ्हास होणार नाही. पण काही लोकांना कुंभमेळ्यात अडथळेच यावेत असे वाटते. अशा लोकांना सांगतो की, सरकार अडथळे येऊ देणार नाही, असे फडणवीस यांनी ठणकावून सांगितले.

**काय म्हणाले होते अजित पवार?**

तपोवनातील वृक्षतोडीच्या संदर्भात समोपचारानं तोडगा काढला पाहिजे. यासंदर्भात अभिनेते सयाजी शिंदे यांनी घेतलेली भूमिका पर्यावरण हिताची आहे. विकासाबरोबर पर्यावरणाचा समतोल राखणं ही देखील काळाची गरज आहे. पर्यावरण वाचलं तरच पुढची पिढी सुरक्षित राहील, हे आपण सर्वांनी लक्षात ठेवलं पाहिजे, असे अजित पवार यांनी या वादावर भाष्य करताना म्हटले आहे. मंत्री गिरीश महाजन यांच्याकडून या वृक्षतोडीसाठी जोर दिला जात असताना अजित पवारांनी ही भूमिका घेतली आहे. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसचा मित्रपक्ष असणाऱ्या भाजपची चांगलीच अडचण झाली आहे.

## तोतया आयएएस कल्पना भागवत राम भद्राचार्यांची शिष्या?

■ **वृत्तसंस्था, छ. संभाजीनगर, दि. ३ :**

छत्रपती संभाजीनगरच्या एका बड्या हॉटेलमध्ये बनावट कागदपत्रे देऊन एक महिला तब्बल सहा महिने वास्तव्यास होती. या महिलेचे थेट पाकिस्तान आणि अफगाणिस्तानमध्ये संबंध होते. ही महिला आपण आयएएस अधिकारी असल्याचे सांगत या महिलेवर अत्यंत गंभीर आरोप असून तिच्याकडे धक्कादायक कागदपत्रे सापडली आहेत.



कल्पना भागवत या महिलेचे नाव असून पोलिसांनी तिला अटक केली. तिची कसून चौकशी केली जात आहे. तिच्याजवळ आणि तिच्या मोबाईलमधून हैराण करणारी माहिती पुढे आली. मोठं रॅकेट उघडकीस आलंय. हेच नाही तर ही महिला अनेकांकडून पैसे घेत. पाकिस्तानमधूनही तिला मोठ्या प्रमाणात पैसा मिळाला. आता थेट महिलेला पैसे देणाऱ्या ११ जणांच्या यादीत हिंगोलीचे खासदार नागेश पाटील आष्टीकर यांच्याही नावाचा समावेश झाला.

खासदार नागेश पाटील आष्टीकर यांचे या प्रकरणात नाव आल्याने खळबळ उडाली. यावर बोलताना खासदार नागेश पाटील आष्टीकर यांनी म्हटले की, काल मला हा सगळा विषय लक्षात आला. माझी आणि त्या तोतया अधिकाऱ्याची भेट झाली होती हे वास्तव आहे. माझ्या चुलत भावाच्या मुलाची तिच्यासोबत ट्रेनमध्ये भेट झाली होती. मंदिराला देणगी देण्याची विनंती तिने केली होती. मग ती तोतया अधिकारी माझ्याकडे गावी आली आणि मला भेटली.

रामभद्राचार्य महाराज यांची ती शिष्य असल्याचे सांगत होती. मुलाखतीच्या दरम्यान अधिकाऱ्यांनी माझ्यावर अन्याय केल्याचे तिने सांगितल होते.

सुरुवातीला मी २० हजार मदत केली होती, त्यानंतर ही मी २-४ वेळा काही पैसे दिले. आई आजारी असल्याने मला दीड लाख द्या अशी मागणी तिने मला केली होती. कल्पना भागवतचा कोल्हापूर इथे अपघात झाल्याचे मला एका पुरुष व्यक्तीने फोनवर सांगितल तेंव्हा मी १० हजार रुपये दिले.

२९ ऑक्टोबर रोजी मी शेवटचे पैसे पाठवले आहेत. मी विषय खूप गांभीर्याने घेतला नव्हता. पण अडचण आहे म्हणून मी तिला मदत केली होती. मी तिला गरज म्हणून मदत केली होती, असे नागेश पाटील आष्टीकर यांनी म्हटले.

## अमरसिंह पंडितांना संपवण्याचा होता कट

■ **वृत्तसंस्था, बीड, दि. ३ :**

बीड जिल्ह्यातील गेवराई नगरपालिका निवडणुकीदरम्यान झालेला गोंधळ आणि त्यानंतरच्या घडामोडींमुळे पुन्हा एकदा स्थानिक राजकारणातील तणाव चव्हाट्यावर आला आहे. गेवराईमध्ये मात्र पंडित आणि पवार समर्थकांमध्ये तीव्र संघर्ष उफाळून आला आहे.

या घटनेत माजी आमदार अमरसिंह पंडित यांचे स्वीय सहाय्यक अमृत डावखर गंभीर जखमी झाले असून, त्यांच्यावर बीडमधील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागातून त्यांनी अनेक गंभीर आरोप केले आहेत.

डावखर सांगतात की, ते त्या वेळी पंडित यांच्या कार्यालयात होते. त्यावेळी काही संशयित व्यक्तींनी कार्यालयावर अचानक गाडी घालत प्रवेश केला आणि त्यांच्यासह इतरांवर हल्ला केल्याचा त्यांचा दावा आहे. हा हल्ला अचानक झाल्याने त्यांना स्वतःचे रक्षण करता आले नाही, असेही ते म्हणाले.

हा हल्ला फक्त वादातून झाला नसून, माजी आमदार अमरसिंह पंडित यांना लक्ष्य करूनच हत्येचा कट रचण्यात आला होता. त्यांच्या म्हणण्यानुसार, हल्लेखोरांनी पंडित घटनास्थळी नसल्याचे पाहताच त्यांना नाही तर त्यांचे माणूस संपवा, असे म्हणत त्यांच्यावर प्राणघातक हल्ला केला. त्यांनी काठी, बेल्ट, वापरून मारहाण केल्याचा आरोप डावखर यांनी केला.

## एकनाथ शिंदेच्या बालेकिल्ल्याला उद्धव ठाकरेंनी लावला सुरूंग

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ३ :**

काहीच दिवसांत महानगर पालिका आणि जिल्हा परिषद निवडणुकींची घोषणा होण्याची शक्यता आहे. मुंबई, ठाणे, पुणे अशा राज्यातील महत्त्वाच्या महानगर पालिकांच्या निवडणुकीवर राज्यातील जनतेचे लक्ष असणार आहे. अशातच आता शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने ठाण्यात एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेला मोठा धक्का दिला आहे.



ठाण्यातील शिवसेनेचे उपविभागप्रमुख रामचंद्र पिंगुळकर यांनी आपल्या सहकाऱ्यांसह शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी सर्वांचे पक्षात स्वागत केले. यावेळी राजन विचारे, उपनेत्या किशोरी पेडणेकर, जिल्हाप्रमुख केदार दिघे तसेच इतर पदाधिकारी आणि शिवसैनिक उपस्थित होते. यामुळे शिवसेना शिंदे गटाला मोठा धक्का बसला आहे.

आगामी काळात ठाणे महानगर पालिकेची निवडणूक जाहीर होणार आहे. ठाणे हा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा बालेकिल्ला आहे. यातील उपविभागप्रमुख रामचंद्र पिंगुळकर यांनी एकनाथ शिंदे यांची साथ सोडत उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला आहे. यामुळे शिवसेना ठाण्यात थोडी कमकुवत झाली असून ठाकरे गटाची ताकद वाढली आहे. आता आगामी काळात इतरही नेते पक्षांतर करण्याची शक्यता आहे.


या पक्षप्रवेशानंतर उद्धव ठाकरे यांनी भाजपवर टीका केली आहे. त्यांनी म्हटले की, दगाबाज भाजपला धडा शिकवण्यासाठी महाविकास आघाडीची स्थापना केली. सध्या सत्तेसाठी सगळी लाचारी चालली आहे. मला शिव्या घालत होते. आज त्यांचेच फोटो सोनिया गांधींसोबत आहेत, असे उद्धव ठाकरे यावेळी म्हणाले.

## वामनदादा कर्डक यांच्या नावाने गायकांना पुरस्कार

### भीम संग्राम सामाजिक संघटनेच्या पाठपुराव्याला यश

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. ३ :**

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित १० हजार गाणे लिहिणारे, आपल्या गाण्याच्या माध्यमातून आंबेडकरी चळवळ खेडोपाडी पोहचवणारे महाकवी वामनदादा कर्डक यांच्या नावाने गायकांना पुरस्कार देण्यात यावा, वामनदादा कर्डक यांच्या वतीने आंबेडकरी चळवळीवर लिहिण्यात आलेले साहित्य महाराष्ट्र शासनाच्या वतीने प्रकाशित करण्यात यावे तसेच महाकवी वामनदादा कर्डक यांना राज्य पातळीवरील डि लिट पदवीने सन्मानित करण्यात यावे अशा प्रकारची मागणी भीम संग्राम सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राहुल वडमारे यांनी सामाजिक न्याय विभागासह महाराष्ट्र शासनाकडे लावून धरली होती. अखेर या मागणीला यश आले असून, राज्यातील गायकांना यापुढे महाकवी वामनदादा कर्डक यांच्या नावाने पुरस्कार दिला जाणार आहे.



समाज कल्याण विभाग, पुणे जिल्हाधिकारी, बार्टी तसेच सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव हर्षदिप कांबळे यांच्यासह मंत्रालयातील विविध विभागांना भीम संग्राम सामाजिक संघटनेच्या वतीने निवेदन देऊन सारखा पाठपुरावा केला जात होता. महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाने याची दखल घेत शासन निर्णय जारी केला आहे.

शासकीय परिपत्रकात भीम संग्राम सामाजिक संघटनेच्या वतीने गायकांना वामनदादा कर्डक पुरस्कार देण्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे भीम संग्राम सामाजिक संघटनेच्या वतीने करण्यात आलेल्या पाठपुराव्याला काही प्रमाणात यश आले आहे.

महाकवी वामनदादा कर्डक यांना महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक क्षेत्रात दिली जाणारी डि लिट पदवीने त्यांना सन्मानित करण्यात यावे तसेच त्यांचे साहित्य प्रकाशित करण्यात यावे या मागणीसाठी आता पाठपुरावा केला जाईल असे सांगत एक मागणी पूर्ण झाल्याने भीम संग्राम सामाजिक संघटनेच्या वतीने राज्य सरकारचे अभिनंदन करीत असल्याचे या संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राहुल वडमारे यांनी कळविले आहे.

# नवी मुंबई येथे अनुकरणीय आनंद मेळावा





■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ३ :**

नवी मुंबई येथील सानपाडा ज्येष्ठ नागरिक संघाच्यावतीने नेहमीप्रमाणे महिन्याच्या शेवटच्या दिवशी, अर्थात ३० नोव्हेंबर २०२५ रोजी ५१ ज्येष्ठ नागरिक सभासदांचे वाढदिवस पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन साजरे करण्यात आले.

आनंद मेळाव्याचे वैशिष्ट्य म्हणजे प्रसार माध्यमातील राष्ट्रीय स्तरावरच्या रापा पुरस्कार विजेत्या आणि आंतरराष्ट्रीय न्यूज स्टोरी टुडे पोर्टलच्या निर्मात्या सौ. अलका भुजबळ यांचा, संघाचे जेष्ठ सदस्य उत्तम चव्हाण यांच्या अपघात प्रसंगी मदत करणाऱ्या सौ. अश्विनी संदेश मोरे आणि लक्ष्मीकांत कोळपकर यांचा, संघाचे फलक सुंदर अक्षराने लिहिणारे नारायण साखरे यांचाही माजी नगरसेवक सोमनाथ वास्कर, कोमल वास्कर, समाजसेवक अविनाश जाधव, प्रियंका जाधव यांच्या वतीने शाल, पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला.



संघाचे सचिव जगदीश एकावडे आणि शरद पाटील यांनी प्रास्ताविक केले. यावेळी संघाचे नवनियुक्त अध्यक्ष मारुती विश्वासराव यानी भविष्यात होणाऱ्या कार्यक्रमाची सविस्तर माहिती दिली. वाढदिवसाच्या मानकरी असणाऱ्यांचे निवेदन संघाचे उपाध्यक्ष लक्ष्मण गोळे यांनी केले. देणगीदारांची नावे संघाचे खजिनदार महादेव पाटील यांनी वाचली. तर आभार संघाच्या उपाध्यक्षा सीमा बोराडे यांनी मानले.

ज्येष्ठ नागरिक संघाचे कार्यकर्ते पत्की आणि इतर सभासदांनी वाढदिवसाचे सामूहिक गाणे गायले. शेवटी ज्येष्ठ नागरिकांना स्नॅक्स वाटप करून आनंद मेळाव्याची सांगता झाली.या मेळाव्यास संघाचे आजी, माजी पदाधिकारी, सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अधिकार, संधी आणि प्रशासनाच्या उदासीनतेविरुद्ध उभा राहणारा संघर्ष

जागतिक दिव्यांग दिन



**दिपक कैतके**
**मुंबई.**

दरवर्षी ३ डिसेंबर हा दिवस संपूर्ण जगभर जागतिक दिव्यांग दिन म्हणून पाळला जातो. संयुक्त राष्ट्रांनी १९९२ मध्ये या दिवसाला अधिकृत मान्यता दिली.

दिव्यांग व्यक्तींना समान संधी, हक्क, सन्मान मिळावा आणि त्यांच्या प्रश्नांविषयी समाजात व प्रशासनात जागरूकता निर्माण व्हावी हा यामागील मूलभूत उद्देश. मात्र, या उद्देशाला तीन दशकं उलटूनही दिव्यांग व्यक्तींना भेडसावणाऱ्या अडचणींचा भडिमार आजही कायम आहे. हाच या दिवसाचा कडू सत्याचा आरसा.

**कायद्यांपेक्षा वास्तव कठोर**

भारतामध्ये दिव्यांग व्यक्तींसाठी २०१६ मध्ये 'Rights of Persons with Disabilities Act' (RPwD Act) लागू करण्यात आला. या कायद्यात ७ वरून २१ दिव्यांगतेचे प्रकार मान्य करण्यात आले. शिक्षण, रोजगार, आरोग्य सेवा, सार्वजनिक ठिकाणे, कार्यालये, वाहतूक व्यवस्था, तक्रार निवारण– सर्व क्षेत्रांमध्ये समान प्रवेश आणि सन्मानाची हमी या कायद्यात आहे. पण हा कायदा जसा कागदावर सक्षम आहे, तशी अंमलबजावणी मात्र अत्यंत कमकुवत आहे.

सरकारी कार्यालयांपासून महापालिकांपर्यंत प्रवेशयोग्यता आजही नावालाच आहे. अनेक ठिकाणी रॅम्प नाही, tactile मार्ग अर्धवट आहे, लिफ्ट कायम बंद असतात. दिव्यांगांसाठी असलेले ४ टक्के आरक्षण वर्षानुवर्षे रिकामे, तर प्रमाणपत्रासाठीची प्रक्रिया एवढी गुंतागुंतीची की सुविधा मिळवताना स्वतःचा सन्मान हरवावा लागतो.

**आधुनिक मेट्रो, पण दिव्यांगांसाठी सुविधांचा अभाव**

राज्यात व देशभरात वेगाने उभारल्या जात असलेल्या मेट्रो सेवांविषयी मोठमोठ्या घोषणा होतात. या सेवांना ह्यसमावेशक विकासह म्हटले जाते. पण प्रत्यक्षात दिव्यांग व्यक्तींना या मेट्रोमध्येही अनेक अडथळ्यांना सामोरे जावे लागते.

मेट्रोमध्ये दिव्यांगांसाठी प्राधान्य आसनं, लिफ्ट आणि स्टिकर्स असतात; पण
लिफ्टसाठी दीर्घ प्रतीक्षा,
tactile मार्गांमध्ये तुटकपणा,
मदतीसाठी प्रशिक्षित कर्मचाऱ्यांचा अभाव,
आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे तिकीट सवलत अत्यंत मर्यादित आणि जटिल प्रक्रियेत अडकलेली.... ही स्थिती अजूनही शाबूत आहे.

दिव्यांग व्यक्तींना अनेकदा सुरक्षा कर्मचाऱ्यांना स्वतःची स्थिती समजावून सांगावी लागते. प्रत्येक वेळी मला मदत हवी, असे सांगणे हीच प्रशासनाच्या अपुऱ्या संवेदनशीलतेची ताजी साक्ष आहे.

अपुरी सुविधा म्हणजे अडथळा नव्हे, अपमान दिव्यांग व्यक्तींचे प्रश्न हे केवळ सुविधा देण्याचे नाहीत. ते मूलभूत हक्कांचे प्रश्न आहेत.

एखाद्या व्यक्तीला प्रवास, शिक्षण, रोजगार, आरोग्यसेवा, तंत्रज्ञान, या सर्वांचा समान लाभ मिळणं हे मानवधर्म आहे. पण दिव्यांग व्यक्तींना अजूनही यासाठी सतत कागदपत्रांचा आणि अडथळ्यांचा लढा द्यावा लागतो.

आज अनेक दिव्यांग व्यक्ती शिक्षण, आयटी, क्रीडा, कला, प्रशासन, उद्योजकता अशा विविध क्षेत्रांत चमकदार यश मिळवत आहेत. त्यांची क्षमता प्रचंड आहे. कमतरता त्यांच्या शरीरात नसून व्यवस्थेत आणि धोरणांमध्ये आहे.

**प्रशासनाने संवेदनशील होण्याची गरज**

जागतिक दिव्यांग दिन म्हणजे फलक लावून कार्यक्रम साजरा करण्याची परंपरा राहू नये. हा दिवस प्रशासनाला दिलेली जाबदारीची आठवण आहे.

- सर्व सरकारी व सार्वजनिक इमारती प्रवेशयोग्य करणे,
- मेट्रो व सार्वजनिक वाहतूक दिव्यांगांसाठी खऱ्या अर्थाने अनुकूल करणे,
- तिकीट सवलतींच्या दरात वाढ करणे,
- प्रमाणपत्र प्रक्रिया सुलभ करणे,
- आरक्षणाची अंमलबजावणी काटेकोर करणे

या गोष्टी तातडीने करण्याची वेळ आली आहे.

दिव्यांग व्यक्तींकडून सुविधा मिळवण्यासाठी झगडण्याची अपेक्षा करणे म्हणजे त्यांच्यावर अन्याय करण्यासारखे आहे. हे लाजिरवाणे वास्तव बदलण्याची जबाबदारी शासन व स्थानिक प्रशासन यांचीच आहे.

**दिव्यांगता ही मर्यादा नसून अद्वितीय क्षमता**

दिव्यांगता हा दोष नाही, तर वेगवेगळ्या क्षमतांचा एक प्रकार आहे. अडथळे दूर केले तर दिव्यांग व्यक्ती समाजाच्या प्रत्येक क्षेत्रात मोठी कामगिरी करू शकतात याची अनेक उदाहरणे आपल्या समोर आहेत. पण त्यांना संधी मिळाली तरच ते शक्य आहे.

**जागतिक दिव्यांग दिनाचा संदेश एकच**

सुविधा द्या, अडथळे दूर करा, दृष्टीकोन बदला. दिव्यांग व्यक्तींच्या सन्मानाचा आणि अधिकारांचा प्रश्न हा एक दिवसाचा नाही, तो समाजाच्या संवेदनशीलतेचा आणि प्रशासनाच्या जबाबदारीचा आरसा आहे.

विकास सर्वसमावेशक तेव्हाच, जेव्हा सर्व नागरिकांना समान संधी मिळतात, दिव्यांग नागरिकांसह.

# अमरावती रेल्वे स्थानक स्थलांतराला खासदार वानखडेंचा तीव्र विरोध

■ रेल्वेमंत्र्यांकडे उच्चस्तरीय चौकशीची मागणी
■ स्थानक कायम ठेवण्याचा ठाम आग्रह

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती,( दि.3 )** - अमरावती लोकसभा मतदारसंघाचे खासदार बळवंत वानखडे यांनी अमरावती रेल्वे स्थानक इतरत्र स्थलांतर करण्याच्या प्रस्तावाला जोरदार विरोध नोंदवत केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांना प्रत्यक्ष भेटून सविस्तर पत्र दिले. हा प्रस्ताव भूमाफियांना लाभ मिळवून देण्यासाठी रचलेले कटकारस्थान असल्याचा गंभीर आरोप करत त्यांनी स्वतंत्र उच्चस्तरीय चौकशीची मागणी केली आहे.

खासदार वानखडे यांनी पत्रात नमूद केले आहे की, ब्रिटिशकालीन अमरावती रेल्वे स्थानक हे शहराच्या आर्थिक, सामाजिक आणि औद्योगिक विकासाचे केंद्रबिंदू आहे. स्थानक हटविण्याचा कोणताही प्रस्ताव हा थेट अमरावतीतील जनभावनांविरुद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. काही लोकप्रतिनिधी व्यापारी प्रकल्पासाठी रेल्वेची जमीन



मोकळी करण्याच्या उद्देशाने स्थलांतर प्रस्ताव पुढे ढकलत असल्याचा आरोपही त्यांनी केला. गेल्या काही महिन्यांतील स्ट्रक्चरल ऑडिट, उड्डाणपुलाचे अचानक बंदकरणे, दुरुस्तीला झालेला विलंब आणि त्यामुळे निर्माण झालेला वाहतूक कोंडी या सर्व घटनांमागे स्थानक हटविण्याची योजना असल्याचा संशय त्यांनी व्यक्त केला. यापूर्वीही खासदार वानखडे यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना भेटून राज्य शासनाकडून संबंधित पुलाचा प्रस्ताव केंद्राकडे मार्गी लागावा, अशी विनंती केली होती. या संपूर्ण प्रकरणात केंद्रीय मंत्रालयाने तातडीने हस्तक्षेप करून

### खासदारांनी रेल्वेमंत्र्यांकडे मांडलेल्या प्रमुख मागण्या

अमरावती रेल्वे स्थानक स्थलांतराचा प्रस्ताव तात्काळ रद्द करावा, संबंधित प्रक्रिया, अधिकारी, सल्लागार आणि हितसंबंधांची स्वतंत्र उच्चस्तरीय चौकशी करावी, स्थानक चौकङ्कराजकमल चौक उड्डाणपुलाची दुरुस्ती तातडीने सुरू करावी, स्थानकाचा विस्तार, नवीन गाड्या, यार्ड विकास आणि प्रवासी सुविधांसाठी विशेष योजना मंजूर करावी, रेल्वेची जमीन कमी करून व्यापारी प्रकल्प उभारला जाणार नाही, याची लेखी हमी द्यावी.

जनभावनांचा आदर करावा, अशी अपेक्षा खासदारांनी व्यक्त केली. अमरावतीतील नागरिक, उद्योजक, विद्यार्थी, व्यापारी आणि सामाजिक संस्थांचा एकमताने विरोध असल्याचे ते म्हणाले. कोणत्याही परिस्थितीत रेल्वे स्थानक स्थलांतर होणार नाही, अशी ग्वाही रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिल्याचेही त्यांनी सांगितले.

# चिखलदरा, अचलपूरमध्ये रेकॉर्डब्रेक मतदान

## अमरावती जिल्ह्यात 68.38 टक्के मतदान

महासागर | प्रतिनिधी



**अमरावती, (दि. 3) :** जिल्ह्यातील 11 नगरपरिषद/नगरपंचायतींसाठी झालेल्या निवडणुकांमध्ये मतदारांनी उत्साहपूर्ण सहभाग दर्शवला. एकूण 3,12,436 मतदारांपैकी 2,13,656 जणांनी मतदानाचा हक्क बजावला, म्हणजेच 68.38 टक्के मतदान नोंदले गेले. पुरुषांचा मतदानाचा टक्का 71.66, तर महिलांचा 65.13 टक्के होता. तृतीयपंथी मतदारांमध्ये एकूण 3 जणांनी मतदान केले.

जिल्ह्यातील सर्वाधिक मतदान चिखलदरा येथे झाले. 3,365 मतदारांपैकी 2,868 जणांनी मतदान करून 85.23 टक्के टक्का गाठला. पुरुष मतदारांचा सहभाग 86.56 टक्के तर महिला मतदारांचा 83.99 टक्के होता. अचलपूर नगरपरिषद क्षेत्रात 99,659 मतदारांपैकी 69,496 जणांनी मतदान केले. येथे पुरुषांचा टक्का 73.65 आणि महिलांचा 65.79 टक्के होता, ज्यामुळे अचलपूर जिल्ह्यातील उच्च मतदान करणाऱ्या नगरांपैकी एक ठरले.

इतर भागांमध्ये वरुडमध्ये 64.07 टक्के, दर्यापूरमध्ये 68.66 टक्के आणि मोर्शीमध्ये 65.78 टक्के मतदान नोंदले गेले. शेंदुरजनाघाटमध्ये 73.53 टक्के, चांदूर रेल्वे 68.49 टक्के, चांदूर बाजार 67.13 टक्के, धामणगाव रेल्वे 67.21 टक्के आणि धारणीतील आदिवासी बहुल क्षेत्रात 64.43 टक्के मतदान झाले. सर्वत्र मतदान उत्साहपूर्ण आणि शांततेत पार पडले असून, आता नगराध्यक्ष व नगरसेवक पदाच्या उमेदवारांच्या निकालाची प्रतीक्षा आहे.

**तालुकानिहाय मतदान**

| तालुका | पुरुष मतदान | महिला मतदान | इतर | एकूण मतदान | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| अचलपूर | 36,850 | 32,646 | 0 | 69,496 | 69.73 % |
| वरुड | 13,484 | 12,716 | 0 | 26,200 | 64.07 % |
| दर्यापूर | 13,112 | 11,996 | 0 | 25,108 | 68.66 % |
| मोर्शी | 11,287 | 10,336 | 0 | 21,623 | 65.78 % |
| चिखलदरा | 1,398 | 1,469 | 1 | 2,868 | 85.23 % |
| शेंदुरजनाघाट | 7,255 | 6,564 | 0 | 13,819 | 73.53 % |
| चांदूर रेल्वे | 6,452 | 5,963 | 0 | 12,415 | 68.49 % |
| चांदूर बाजार | 6,537 | 6,076 | 0 | 12,613 | 67.13 % |
| धामणगाव रेल्वे | 6,217 | 5,965 | 0 | 12,182 | 67.21 % |
| धारणी | 4,305 | 4,201 | 2 | 8,508 | 64.43 % |
| नांदगाव-खंडेश्वर | 4,585 | 4,239 | 0 | 8,824 | 73.30 % |

# खोलापुरी गेट येथील घरफोडी प्रकरण उघडकीस

**अमरावती,( दि.3 )** - खोलापुरी गेट पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या घरफोडीच्या गुन्ह्याचा उलगडा गुन्हे शाखेने केला आहे. फिर्यादी राजेश मिश्रा यांच्या तक्रारीनुसार 19 मे 2025 रोजी भारतीय न्याय संहितेच्या संबंधित कलमांतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला होता. या प्रकरणाच्या तपासादरम्यान गुन्हे शाखेला गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की अनिकेत भगत (रा. जलाराम नगर) हा इसम चोरीत सामील आहे आणि संशयास्पद हालचाली करत आहे. त्याला ताब्यात घेऊन चौकशी केल्यानंतर त्याने कबुली दिली की त्याने विकास बागळे आणि हर्षल (पूर्ण नाव उपलब्ध नाही, दोघे रा. पिंपळगाव, जि. यवतमाळ) यांच्यासह ही चोरी केली. अभियोग्यांच्या कबुलीनुसार 18 मे 2025 रोजी प्रभु विहार, खोलापुरी गेट परिसरात राहणारे कॅटरिंग व्यवसायिक राजेश मिश्रा यांच्या घरातून चांदीची गणपती मूर्ती चोरून नेण्यात आली.

# प्रतिबंधित चायना मांजा विक्रेत्या तरुणाला अटक



## 45 हजारांचा मुद्देमाल जप्त

## गुन्हे शाखेची धडक कारवाई

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि. 3)** शासनाने प्रतिबंधित केलेल्या आणि पर्यावरणासाठी घातक ठरणाऱ्या चायना मांजाच्या विक्रीवर गुन्हे शाखेने बुधवारी (3 डिसेंबर) मोठी कारवाई केली. पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने सापळा रचून कुलदीपसिंग बलवीरसिंग टांक (वय 25, रा. सुदर्शन नगर, वडाळी) याला रंगेहाथ पकडले. त्याच्याकडून 45 हजार रुपये किमतीच्या 45 चक्री चायना मांजाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

गुप्त माहितीच्या आधारावर ऑक्सिजन पार्कसमोर संशयित अवस्थेत उभ्या असलेल्या आरोपीला ताब्यात घेण्यात आले. तपासात मोनोकाईट फायटर कंपनीच्या 43 व मोनोफिल्ड गोल्ड कंपनीच्या 2 चक्री असा प्रतिबंधित मांजाचा साठा आढळला. फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात कलम 49, 223 बी.एन.एस. व पर्यावरण संरक्षण कायदा 1986 अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला. कारवाई पो.नि. चव्हाण यांच्या नेतृत्वात महेश इंगोले व पथकाने केली.



## अनियंत्रित दुचाकी आणि टेम्पोची समोरासमोर धडक

दर्यापूर - अनियंत्रित दुचाकी आणि छोट्या टाटा एस टेम्पोची समोरासमोर धडक झाल्याने एक युवक जागीच ठार झाला. ही दुर्दैवी घटना मंगळवारी (दि. 2) सायंकाळी साडेसहा वाजताच्या सुमारास दर्यापूर-अकोला राज्य मार्गावरील रामतीर्थ टी पाईंट जवळ घडली. अपघातात मृत्यू झालेल्या युवकाचे नाव किशोर रामाजी कासदेकर (वय 28) असे असून, तो आदिवासी होता. घटनेच्या वेळी किशोर एम.एच.27 पी.एफ 2560 क्रमांकाच्या दुचाकीने दर्यापूरकडे येत होता. दरम्यान, रामतीर्थ टी पाईंट जवळ समोरून येणाऱ्या मीनी टाटा एसवर दुचाकी जोरदार धडकली. या अपघातात दुचाकीस्वाराचा डोक्यावर जबर मार लागल्याने त्याचा घटनास्थळीच मृत्यू झाला. मृतदेह शवविच्छेदनासाठी दर्यापूर उपजिल्हा रुग्णालयात ठेवण्यात आला असून, येवदा पोलीसांनी पंचनामा करून घटनेची प्राथमिक नोंद केली आहे.

# शिरजगाव बंड येथे सहा वर्षांच्या मुलीवर अत्याचार

## 56 वर्षीय नराधम अटकेत

महासागर | प्रतिनिधी

**चांदूर बाजार, (दि. 3)** शहरालगतच्या शिरजगाव बंड येथील निष्पाप सहा वर्षांच्या चिमुरडीवर 55 वर्षीय विकृताने अत्याचार केल्याची संतापजनक घटना 2 डिसेंबर रोजी घडली. ही धक्कादायक घटना शाळेच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात स्पष्टपणे कैद झाली असून पोलिसांनी आरोपीला तात्काळ अटक केली आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी राजू मुल्ला उर्फ रियाजुद्दीन जहिरुद्दीन मुल्ला (56, रा. शिरजगाव बंड) याने आपल्या घराशेजारी राहणाऱ्या चिमुरडीला बिस्किट देण्याचे आमिष दाखवले. त्यासाठी वीस रुपये देऊन तिला विश्वासात घेतले आणि जिल्हा परिषद शाळेच्या परिसरात नेऊन तिच्यावर लौगिक अत्याचार केला. शाळा परिसरात शांतता असल्याचा फायदा घेत हा घृणास्पद प्रकार घडवून आणल्याचे सीसीटीव्ही फुटेजमधून स्पष्ट झाले आहे.

घटना समोर आल्यानंतर मुलीच्या आईने दिनांक 3 डिसेंबर रोजी चांदूरबाजार पोलीस स्टेशन गाठून आरोपीविरुद्ध तक्रार दाखल केली. तक्रारीवरून पोलिसांनी तत्काळ गुन्हा दाखल करत बीएनएस कलम 64 (1), 65 (2) सह पोस्को कलम 4, 6, 12 कायद्यान्वये आरोपीला अटक केली. ठाणेदार अशोक जाधव, पोलीस उपनिरीक्षक विनोद इंगळे यांचा मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे. आरोपीवर कठोर गुन्हे दाखल करण्यासाठी पीडित मुलीचे नातेवाईक सह शहरातील नागरिकांनी पोलीस स्टेशनमध्ये पोहोचून मागणी केली होती. यामुळे पोलीस स्टेशन परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मालेगावसारख्या प्रकरणानंतर राज्यभर संतापाची लाट उसळलेली असताना अमरावती जिल्ह्यातील चांदूर बाजारातील ही घटना समाजमनाला पुन्हा एकदा हादरवून सोडणारी आहे. अल्पवयीनांवरील अत्याचाराच्या वाढत्या घटनांमुळे कठोरात कठोर कायदा बनवून त्याची काटेकोर अंमलबजावणी करण्याची मागणी अधिक तीव्र होत आहे.

### पोलीस ठाण्यावर धडकला जमाव, शहरात तणाव

आरोपीविरुद्ध कायदेशीर कारवाई सुरू होती. या वेळी काही नागरिक पोलीस स्टेशनवर धडकले. पोलीसांनी नागरिकांना शांत राहून घरी जाण्याचे आवाहन केले. परंतु काही समाजकंटकांनी परिसरातील दुकाने व इतर स्थापनांवर दबाव टाकण्याचा प्रयत्न केला. शहरात तणाव निर्माण होण्याच्या भीतीवरून पोलीसांनी काही समाजकंटकांना ताब्यात घेत कायदेशीर कारवाई सुरू ठेवली आहे. परिसरात सध्या शांतता असून पोलीस लक्ष ठेवून आहेत. नागरिकांनी अफवा न पाळता शांतता राखावी व कोणतीही अनुचित घटना त्वरित पोलीसांना कळवावी, असे आवाहन करण्यात आले आहे.



# युवकाच्या ताब्यातून देशी कट्टा, जिवंत काडतुस जप्त

## अमरावती-बडनेरा मार्गावरील रेल्वे पुलाखाली कारवाई

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती,( दि.3 )** - अमरावती पोलिसांनी बडनेरा रोड, नेमानी गोडाऊनच्या बाजूला रेल्वे पुलाखाली धडक कारवाई करत 19 वर्षीय युवराज मुकिंदसिंग बावरी (रा. कालीमाता नगर, बडनेरा रोड, अमरावती) याचे ताब्यात एक देशी बनावटी कट्टा (पिस्टल) व पाच नग जिवंत काडतुस असा एकूण 45,000 रुपये मूल्याचा मुद्देमाल जप्त केला आहे. याबाबत बडनेरा पोलीस स्टेशनवर कलम 3/25 आर्म्स



ॲक्ट आणि कलम 135 म.पो.क.अ. नुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पोलिसांनी घटनास्थळी तत्काळ हस्तक्षेप करत आरोपीला ताब्यात घेतले असून, पुढील तपास सुरू आहे.

# अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघात 29,816 मतदार

## प्रारूप मतदार यादी जाहीर; 3 ते 18 डिसेंबरपर्यंत आक्षेप-हरकतींचा स्वीकार



महासागर | प्रतिनिधी

**अमरावती,( दि. 3 )** - महाराष्ट्र विधान परिषदेच्या शिक्षक मतदारसंघासाठी 1 नोव्हेंबर 2025 या अर्हता दिनांकावर आधारित (De-nova) मतदार यादी तयार करण्याच्या कामात महत्त्वाची टप्पा गाठत अमरावती विभागाची प्रारूप मतदार यादी आज जाहीर करण्यात आली. या यादीत एकूण 29,816 मतदारांचा समावेश असून त्यात 21,072 पुरुष, 8,742 महिला आणि 2 इतर मतदार आहेत, अशी माहिती अपर आयुक्त संजय जाधव यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली.

प्रारूप याद्यांच्या प्रत्या विभागीय, जिल्हा, उपविभागीय आणि तहसील कार्यालयांमध्ये उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. मतदार नोंदणी अधिनियम 1960 नुसार पुनरिक्षणाची प्रक्रिया ठराविक वेळापत्रकानुसार राबवली जात आहे. याद्यांवर 3 ते 18 डिसेंबर 2025 या कालावधीत दावे व हरकती दाखल करता येतील. प्राप्त अर्जांची सुनावणी 5 जानेवारी 2026 रोजी होईल. त्यानंतर पुरवणी यादी तयार करून त्याच दिवशी छपाई केली जाणार आहे.सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर 12 जानेवारी 2026 रोजी अंतिम मतदार यादी जाहीर केली जाईल. अद्याप पात्र असूनही ज्यांची नावे नोंदणीत राहिली असतील, अशा शिक्षकांना लवकरात लवकर अर्ज करण्याचे आवाहन विभागीय आयुक्त कार्यालयाने केले आहे.

**जिल्हानिहाय अर्ज व पात्रता**

| | | |
|---|---|---|
| **अमरावती** | | |
| प्राप्त अर्ज | : पुरुष 5160, महिला 3088 — 8248 | |
| पात्र | : पुरुष 5086, महिला 3018 — 8104 | |
| अपात्र | : पुरुष 74, महिला 70 — 144 | |
| **अकोला** | | |
| प्राप्त अर्ज | : पुरुष 3374, महिला 1580, इतर 1 — 4955 | |
| पात्र | : पुरुष 3333, महिला 1549, इतर 1 — 4883 | |
| अपात्र | : पुरुष 42, महिला 30 — 72 | |
| **यवतमाळ** | | |
| प्राप्त अर्ज | : पुरुष 4266, महिला 1562, इतर 1 — 5829 | |
| पात्र | : पुरुष 4180, महिला 1533, इतर 1 — 5714 | |
| अपात्र | : पुरुष 86, महिला 29 — 115 | |
| **वाशिम** | | |
| प्राप्त अर्ज | : पुरुष 2492, महिला 693 — 3185 | |
| पात्र | : पुरुष 2412, महिला 648 — 3060 | |
| अपात्र | : पुरुष 80, महिला 45 — 125 | |
| **बुलढाणा** | | |
| प्राप्त अर्ज | : पुरुष 6344, महिला 2304 — 8648 | |
| पात्र | : पुरुष 6062, महिला 1993 — 8055 | |
| अपात्र | : पुरुष 282, महिला 311 — 593 | |
| **एकूण** | | |
| प्राप्त अर्ज | : पुरुष 21636, महिला 9227, इतर 2 — 30865 | |
| पात्र | : पुरुष 21072, महिला 8742, इतर 2 — 29816 | |
| अपात्र | : पुरुष 564, महिला 485 — 1049 | |


# ग्रामपंचायत कार्यालय हिरूळ पूर्णा

## पंचायत समिती चांदूर बाजार, जि.अमरावती

ग्रामपंचायत कार्यालय हिरूळपूर्णा ता. चांदूर बाजार जि. अमरावती यांचे मार्फत अनुसूचित जाती व नवबौद्ध घटक वस्तीचा विकास करणे योजने अंतर्गत खालील कामाची मोहरबंद निविदा ब-१ टक्केवारी प्रपत्रामध्ये बांधकाम विभाग, अमरावती यांचे वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून मागविण्यात येत आहे. कोऱ्या निविदा सरपंच/सचिव ग्रामपंचायत कार्यालय हिरूळ पूर्णा कडून देण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | योजनेचे नाव | कामाची किंमत | अनामत रक्कम | निविदा फी | कामाचा कालावधी | कोऱ्या निविदा मिळण्याचा दिनांक | निविदा उघडण्याची दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | रस्ता बांधकाम करणे | अनूसूचित जाती व नवबौद्ध घटक वस्तीचा विकास करणे योजने अंतर्गत सन २०२५-२६ | ५,००,०००/- | १ % | ५००/- | ३ महिने | दि. ०३/१२/२०२५ ते १०/१२/२०२५ (कार्यालयीन वेळेत) | दि.११/१२/२०२५ ३ वाजेपर्यंत |
| २ | कॉंक्रिट रस्ता व नाली बांधकाम | | ५,००,०००/- | १ % | ५००/- | ३ महिने | | |

टिप :-
१) निविदाच्या अटी व शर्ती ग्रा.पं. कार्यालय हिरूळ पूर्णा ता. चांदूर बाजार जि. अमरावती यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत पाहावयास मिळतील.
२) निविदा ह्या दोन लिफाफे पद्धतीने सादर कराव्या.
३) निविदा स्विकारण्याचे तसेच काही कारणास्तव निविदा रद्द करण्याचे अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवलेले आहे.

सरपंच/सचिव
ग्रामपंचायत हिरूळ पूर्णा
ता. चांदूर बाजार जि.अमरावती.

# संविधानाचे प्रबोधन नको तर संरक्षण हवे!

नरेंद्र दाभोळकर ते गौरी लंकेशच्या हत्येनंतर बरेच विचारवंत (काही अपवाद वगळता) भाषण करताना, विचार मांडताना घाबरताना दिसतात. संविधानाला असणाऱ्या धोक्याबद्दल बोलताना त्यांच्या बोलण्यात आक्रमकता, थेट टीका दिसत नाही. २६ नोव्हेंबरला आपण भारतीय संविधान दिन साजरा केला. याच दिवशी १९४९ साली आपण संविधान स्वीकारले होते. म्हणून हे आपण संविधानाचे अमृत महोत्सवी वर्ष सादर करत आहोत. परंतु मीडियामध्ये कुठे गवगवा होताना दिसत नाही.

संविधानामध्ये अभिप्रेत असलेली लोकशाही जिवंत आहे का यावर विचार करण्याची गरज आहे. बरेच जणांना वाटतं की निवडणूक प्रक्रिया राबवणे म्हणजेच लोकशाही. हे चुकीचे आहे. रशियामध्ये सुद्धा निवडणुका होतात. पण तिथे हुकूमशाही आहे. पाकिस्तानने नुकतेच २७ वी घटनादुरुस्ती केली. कार्यपालिका, विधिमंडळ व न्यायपालिका या लोकशाहीच्या तीन स्तंभामध्ये 'लष्कर' हे चौथे स्तंभ म्हणून मान्यता दिली आहे.

संविधानाच्या विविध कलमांमध्ये काय अभिप्रेत आहे? न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुभाव, धर्मनिरपेक्षता, लोक तांत्रिक समाजवाद, वैज्ञानिक दृष्टिकोन. पण आज ही सर्व मूल्य वेळोवेळी तुडवल्या जात आहेत.

मागील महिन्यात उत्तराखंड मधील राजाजी प्रकल्पातील मशिदीला सील लावले. संविधानामध्ये आपापल्या धमार्चे पालन करण्याचे स्वातंत्र्य बहाल केले आहे. परंतु सध्या विविध धर्म स्थळांचे उत्खनन करून वाद निर्माण केले जात आहेत. "Places of Worship Act १९९१ प्रमाणे १५ ऑगस्ट १९४७ रोजी धर्मस्थळांची जी स्थिती आहे ती कायम ठेवा, असे लिहिले आहे.

नाशिकच्या कुंभमेळ्यासाठी २५,०५५ कोटी रुपयांची उधळपट्टी होत आहे. तेथील तपोवनातील १८०० जुन्या झाडांची कत्तल केली जात आहे. कुठे आहे वैज्ञानिक दृष्टिकोन?

अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या अधिकाराने न्याय मागण्यासाठी आंदोलन करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांना तुरुंगात पाठवण्यासाठी 'जन दडपशाही कायदा' आणला आहे. न्याय मागण्यासाठी लढणारे पर्यावरणवादी सोनम वांगचुक तुरुंगात आहेत. तर बलात्कारी आसाराम व गुरमीत सिंग जामीन वर बाहेर मोकाट फिरत आहेत. मालेगाव खटल्यातील सात आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली. त्यातील एक आरोपी प्रसाद पुरोहितला भूदलाच्या कर्नल पदी बढती देण्यात आली.

तामिळनाडूच्या खटल्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने असा निकाल फिरवला आहे की विधिमंडळाने मान्य केलेल्या विधेयकावर निर्णय घेण्यासाठी राष्ट्रपती व राज्यपालांवर वेळेचे व मुदतीचे बंधन घालता येणार नाही. म्हणजे विरोधी पक्षाचे सरकार असणाऱ्या राज्यांना जनहिताची काहीच कामे करता येणार नाहीत. खरे तर राज्यपाल हे पद अराजकीय असते. परंतु महाराष्ट्रातील राज्यपालांची लाजिरवाणी राजकीय भूमिका आपण अनुभवलीच आहे.

सीबीआय, ईडी, आरबीआय, निवडणूक आयोग, सेबी, इन्कम टॅक्स या घटनात्मक संस्थांनी स्वायत्तता गमावली आहे. स्टॅटिस्टिकल रिपोर्ट मध्ये सरकारचा हस्तक्षेप वाढला आहे. कॅग रिपोर्ट, आत्महत्या आकडेवारी, एनसीआरबी, बेरोजगारी हे रिपोर्ट येणे तरी बंद झाले किंवा त्यांची विश्वासार्हता राहिली नाही.

बहुआयामी दारिद्र्य रेषेच्या सर्वेक्षणाचे निकष बदलून असा दावा केला जातो की दहा वर्षांत भारतातील सुमारे २९.६ कोटी लोक अत्यंत दारिद्र्यातून वर आले आहेत आणि देशात आता फक्त ५ टक्के लोक दारिद्र्यरेषेखाली आहेत. पण दुसरीकडे आजही तब्बल ८० कोटी लोकांना अन्नसुरक्षा योजनेमधून अन्नधान्य पुरवतो आहोत. मग हा विरोधाभास नाही का?

माहिती अधिकार अधिनियमा मध्ये बदल केल्यामुळे तो संपल्यात जमा आहे. ३० जून २०२५ पर्यंत सुमारे चार लाख अर्ज उत्तर देण्यासाठी प्रलंबित होते. माहीती न दिल्यामुळे कोणाला शिक्षा झाल्याचे ऐकिवात नाही.

**सतिश देशमुख**
**समन्वयक**
**टास्क फोर्स शुगर कोअर कमिटी**
**दूध संघर्ष महाअभियान**
**नदी जीवनवाहिनी संघर्ष कृती समिती**
**मानव - वन्य प्राणी संघर्ष अभियान**
**प्रवर्तकः साने गुरुजी वैचारिक मंच**
**हडपसर, पुणे.**

संविधानाच्या अंमलबजावणीच्या अगोदरची जी स्थिती होती (म्हणजे २६ जानेवारी १९५० च्या अगोदर) ती स्थिती संविधान विरोधी भाजप व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांना पुनर्स्थापित करायची आहे. त्यावेळी नेमकी काय परिस्थिती होती ते समजून घेऊ या.

त्यावेळी मतदानाचा हक्क फक्त मूठभर उच्चभ्रू श्रीमंत २२ टक्के लोकांनाच होता, जे इन्कम टॅक्स भरत होते. संविधानाच्या अंमलबजावणीनंतर हा मूल्यवान हक्क भारतातील सर्व जाती, जमाती, धर्म, गरीब लोकांना प्रदान करण्यात आला.

आता पुन्हा डुप्लिकेट मतदार, होट चोरी, सीएए, एनआरसी, मतदार याद्यांची सखोल पडताळणी (एसआरआर) च्या माध्यमातून मुस्लिम व अल्पसंख्यांक मतदारांना मुद्दाम यादीतून वगळण्याचे प्रकार चालू आहेत.

पूर्वीच्या काळात काही ठराविक लोकांकडे संपत्तीचे एकत्रीकरण झाले होते जसे जमीनदार, वतनदार, संस्थानिके. त्यांच्याकडे अमर्याद जमिनीचे मालकी हक्क होते जे त्या काळात मुख्य उपजीविकेचे साधन होते. आज एक टक्के उद्योगपतींकडे देशातील ४०.१ टक्के आर्थिक संपत्ती एकवटली आहे. आणि शेवटच्या ५०% गरीब लोकांकडे फक्त ६.४% संपत्ती आहे. ही असमानता ब्रिटिशांच्या काळापेक्षा खूप जास्त आहे. संविधानामध्ये आर्थिक समते बद्दल लिहिले आहे. त्याचे हे उल्लंघन आहे.

पूर्वी धर्माचा दाखला देत शूद्र व महिलांना शिक्षणाचा अधिकार नाही, धर्मशास्त्रानुसार ते पाप आहे असे हिंसकपणे सांगितले जाई. आज शिक्षणाचा मोफत व सक्तीचा कायदा असताना महाराष्ट्रात १४,७८३ शाळा पटसंख्या अभावी बंद करण्याचा घाट घातला आहे. एका बातमी नुसार ५.२१ लाख मुला मुलींनी बस पाससाठी अर्ज केले. व ते १५ - २० किलोमीटर प्रवास करून शाळेत जात आहेत.

'शाळा दत्तक योजना' या गोंडस नावाखाली खाजगीकरणाकडे वाटचाल सुरू आहे. आणि गोरगरीब मुलांना शिक्षणापासून वंचित ठेवले जात आहेत. पूर्वी धर्मपीठ, जातपंचायत द्वारे न्याय निवाडा करून कायदेशीर शिक्षा करण्याचे अधिकार धर्माकडे होते. संविधानामुळे हे हक्क न्यायपालिकेकडे आले.

पूर्वी जातीप्रमाणे व्यवसाय करण्याचे बंधनकारक होते. संविधानाने, प्रत्येकाला जो आवडेल तो व्यवसाय करायचे स्वातंत्र्य बहाल केले आहे. पण सरकारने गोवंश हत्या बंदी सारखे अन्यायकारक कायदे आणून व्यवसाय बंदी आणली आहे. गोरक्षकांकडून शेकडो लोकांची हत्या झाल्या आहेत.

संसदीय संशोधन आणि अभ्यास संस्थेच्या अहवालानुसार देशातील १३ आघाडीच्या राज्यांना अर्थसंकल्पातील किमान ७० टक्के रक्कम वेतन, निवृत्ती वेतन, अनुदानावर खर्च होते व फक्त ३० टक्के रक्कम शाळा, रुग्णालय व इतर पायाभूत सुविधांसाठी शिल्लक राहते. त

यांनी म्हटले आहे की विशेषतः लाडकी बहीण, लाडो लक्ष्मी, महिला समृद्धी यासारख्या योजनांमुळे तिजोरीवर ताण पडला आहे. भारतीय संविधानातील कलम ३८ आणि ३९ ही राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्वे कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेला बळ देतात. परंतु आज कल्याणकारी योजनांचे विकृतीकरण झाले आहे. त्या योजना निवडणूकीच्या अगोदर सुरु करतात. अश्या रीतीने निवडणूक लाच देण्याला कायदेशीर मान्यता मिळाली असून चुकीचे पायंडे प्रचलित झाले आहेत.

ह्या ठिकाणी आवर्जून उल्लेख करावाच लागेल की गेल्या अनेक वर्षात, विविध पक्षांच्या सरकारने 'मूळ' राज्यघटनेमध्ये वेळोवेळी केलेल्या (ना)दुरुस्तीमुळे शेतकऱ्यांच्या मूलभूत हक्काला धक्का पोहोचत असल्यामुळे शेतकरी पारतंत्र्यात आहे. त्याचा न्यायालयात दाद मागण्याचा, जिवीत रक्षणाचा, मालमत्तेचा, व्यवसाय स्वातंत्र्याचा हक्क हिरावून घेतला आहे.

भारतीय संविधान दिनाचे औचित्य साधून 'राष्ट्र सेवा दल' व 'साने गुरुजी वैचारिक मंच' यांनी संयुक्तिकरित्या संविधाना पुढील आव्हाने या विषयावर कार्यक्रम आयोजित केला होता. वेळे अभावी मी माझी भूमिका विस्तृतपणे मांडू शकलो नव्हतो. म्हणून या लेखाद्वारे देत आहे.

# भारतीय नौसेना दिवस सागर रक्षकांच्या शौर्याचा गौरवदीन

भारतीय सीमांचे रक्षण म्हणजे देशाच्या सर्व बाजूंनी देशाचे रक्षण करणे होय. यात देशाच्या समतल जमिनीवरील सीमा, वाळवंटीय प्रदेशातील सीमा, पर्वतीय प्रदेशातील सीमा, अतिथंड अश्या हिमप्रदेशातील सीमा, सागरी सीमा अशा विविध भौगोलिक क्षेत्रातील सीमांचा यामध्ये समावेश होतो.

देशाच्या या विविध सीमांची सुरक्षा म्हणजे देशाच्या सामरिक स्वायत्ततेचा दृढ पाया आहे. यामध्ये देशाच्या सागरी सीमांचे रक्षण करणाऱ्या भारतीय नौसेनेच्या शौर्य, पराक्रम आणि अतुलनीय समर्पणाचा गौरव करण्यासाठी दरवर्षी ४ डिसेंबर रोजी भारतीय नौसेना दिवस साजरा केला जातो.



**सुमेघ रामचंद्र वानरे**
**(शिक्षक)**
**नॅशनल मिलिटरी स्कूल,**
**अकोला.**
**९१३००२१३८७**

हा दिवस १९७१ च्या भारत-पाक युद्धातील ऑपरेशन ट्रायडंटच्या विजयी स्मृतींना वंदन करणारा दिवस आहे. या दिवशी भारतीय नौदलाने पाकिस्तानच्या कराची बंदरावर धडक देत शत्रूची महत्त्वाची नौदल शक्ती पूर्णपणे निष्प्रभ केली होती.

भारताची सागरी सीमा सुमारे ११००० किमी (आधी ती ७,५०० किमी एवढी होती आता सुधारित मोजमापानुसार ती ११००० किमी आहे.) पेक्षाही जास्त लांब आहे तर समुद्रात देखील ती अनेक नॉटिकल मैलांपर्यंत पसरलेली आहे. अशा या विस्तृत सागरी सीमेचे रक्षण करण्याची जबाबदारी भारतीय नौसेनेची आहे.

सागरी सीमेच्या संरक्षणाव्यतिरिक्त व्यापार, ऊर्जा, मत्स्यसंपदा, सामरिक वाहतूक या सर्वांचे रक्षण करण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी देखील नौदलावर आहे. त्यामुळे नौदलाचे धैर्य हे केवळ युद्धस्थितीतच नव्हे, तर शांततेच्या काळातही सतत कार्यरत राहणारे असते.

हिंद महासागरातील बदलत्या भू-राजकीय परिस्थितीत भारताने मजबूत नौदलाची गरज ओळखली आहे. क्ठर विक्रांतसारखा स्वदेशी विमानवाहू जहाजाचा समावेश, स्कॉर्पीन पाणबुडी प्रकल्प, आधुनिक डेस्ट्रॉयर्स आणि फ्रिगेट्स यामुळे आज नौसेना अधिक सक्षम, चपळ आणि तांत्रिकदृष्ट्या अत्याधुनिक झाली आहे. भारतीय नौसेना आज ब्लू वॉटर नेव्हीच्या दिशेने वेगाने आगेकूच करत आहे.


मल्टिरोल युद्धनौका, अत्याधुनिक पाणबुड्या, नौसैनिक विमानतळे, तसेच समुद्रातून क्षेपणास्त्र प्रक्षेपण क्षमता या सर्वांमुळे भारताची सागरी सुरक्षा अभेद्य बनली आहे. जगातील महत्त्वाच्या शिपिंग लेन्सवर भारतीय नौदलाची सतत गस्त असते. सागरी चाचेगिरी रोखण्यापासून ते आंतरराष्ट्रीय पाण्यात अडकलेल्या जहाजांना मदत करण्यापर्यंत नौदलाची भूमिका व्यापक आणि जागतिक स्तरावर मान्यता पावलेली आहे.

नौदल हे फक्त युद्धशक्ती नव्हे, तर मानवतेचे रक्षणकर्तेही आहे. चक्रीवादळ, सुनामी किंवा पूरपरिस्थिती ओढवल्यावर नौसैनिक सर्वप्रथम मदतीसाठी धावून येतात. २००४ च्या विनाशकारी सुनामीनंतरची बचावमोहीम, यमनमधून भारतीयांची सुटका (ऑपरेशन राहत), तसेच शेकडो मानवीय मिशन्स हे नौदलाच्या करुणामय जबाबदारीचे प्रत्ययकारी उदाहरण आहे.

भारतीय नौदल दिवस हा फक्त भारतीय नौसेनेतील सैनिकांचा गौरवदिवस नसून, आपल्या भविष्यातील पिढ्यांना प्रेरित करणारा दिवस आहे. समुद्रातील प्रत्येक लाटेत देशभक्तीची जाज्वल्य भावना जागवणाऱ्या नौसैनिकांच्या साहसामुळेच आज आपला देश सुरक्षित, सक्षम आणि गौरवशाली महासत्तेकडे वाटचाल करत आहे. नौसेनेच्या तिन शब्दांत सामावलेल्या शं नो वरुणः या ब्रीदवाक्यात आजही भारताच्या सागरी सामर्थ्याचे द्योतक आहे. आजच्या या दिवशी राष्ट्राच्या सुरक्षित सागरी सीमांसाठी अहोरात्र सज्ज असणाऱ्या भारतीय नौसेनेचा समस्त भारतीयांना अभिमान आहे. जयहिंद!

■ ■ ■

# मसानातले दिवे... वास्तव मांडणारा कविता संग्रह




**प्रवीण कांबळे**
**अमरावती.**
**९२२६२६०६०९**

मसानातले दिवे हे कविता संग्रहाचे शीर्षक जरी काहीसे वेगळे वाटत असले तरी कवी श्री. न. डोंगरे हे शीर्षकाच्या खोलात गेले असावेत आणि यातूनच त्यांनी कविता संग्रहाला मसानातले दिवे हे शीर्षक दिले असावे.

या कविता संग्रहाआधी भरारी नावाचा पहिला कविता संग्रह साहित्य प्रांतात दाखल झाला आणि त्यानंतर साहित्य प्रांतात दाखल होणारा मसानातले दिवे हा कवी श्री.न.डोंगरे यांचा दुसरा कविता संग्रह होय.या कविता संग्रहावर आपण लिहावे आणि जे काही कवितेत दडले आहे याची उकल करावी तसेच रसिक, वाचक वर्गापर्यंत हा कविता संग्रह पोहचावा हाच यामागचा प्रामाणिक हेतू आहे.

मसानातील दिवे या कविता संग्रहातील कवी श्री. न. डोंगरे यांची ज्ञान सूर्य दूर गेला ही कविता गझलकडे वळताना दिसते. एकंदरीत कवी डोंगरे यांच्या कविता वृत्तबद्ध असल्याचे जाणवते. स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता यावर आधारित भारताची राज्यघटना असून, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिवार्णाने स्वतंत्र भारतातील जनतेला जे दुःख झाले त्या दुःखाला कवी श्री. न. डोंगरे यांनी कवितेतून वाचा फोडली आहे.

*तो ज्ञानसूर्य अमुच्या पासून दूर गेला*
*डोळ्यात आसवांचा ठेवून पूर गेला*

खरेतर ही कविता गझलकडे वळलेली दिसते. कवी श्री. न. डोंगरे यांनी गझल तंत्राचा अभ्यास केल्यास त्यांच्या हातून चांगली गझल निर्मिती होऊ शकते.संविधान वाचू या ही कविता नुसती कविता नसून कवीने दिलेली आंतरिक हाक आहे. मानसिक संतुलन बिघडलेले संविधान बदलण्याची भाषा बोलतात तेव्हा पुन्हा गुलामी येईल का ही भीती कवीला स्वस्थ बसू देत नाही.त्यामुळेच कवी श्री. न. डोंगरे जागल्याची भूमिका पार पाडत कवितेतून सजग करतांना दिसतात .

*अंधारल्या धुक्यात दिसते नवीन छाया*
*येते नवी गुलामी आम्हास रे जगाया*
*ऐका रे बांधवांनो जाईल वेळ वाया*
*संग्राम हा लढूया संविधान वाचवाया*

तथागत भगवान गौतम बुद्ध यांचे तत्वज्ञान हे मानवी उत्कृषाचे तत्वज्ञान आहे.तथागतांचा माणूस केंद्रीत धम्म आहे. धम्म हा माणसाच्या दुःख मुक्तीचा मार्ग आहे. तथागतांचा विचार हा स्त्री, पुरुष समानतेचा विचार आहे. माणसाला माणुसकी शिकविणारा विचार आहे. त्यामुळे, कवी श्री. न. डोंगरे हे तव धम्मचक्र या कवितेत जगाला शांतीच्या संदेश देणाऱ्या आणि मानवी उत्कर्षाला पोषक अशा माणसतज्ञ तथागतांचा गौरव करतात.

*सिद्धार्थ गौतमा तुम्ही झालात ज्ञानराजा*
*ज्ञानी तुमच्या समान नाही कुणी जगात*
*संदेश तुम्ही सुखाचा देऊनिया जगाला*
*नांदो सदैव शांती हर एक माणसात*

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी, जा आणि आपल्या घराच्या भिंतीवर लिहून ठेवा, मला या देशाची शासनकर्ती जमात बनायचे आहे. असे म्हटले पण प्रत्यक्षात मात्र ते अंगीकृत केले नाही. नेते पण नेतृत्व नाही. परिणामी राजकारणात गती मिळाली नाही. यातूनच चळवळीची रान झालेली अवस्था कवीला अस्वस्थ करते.

*तव क्रांतीच्या रथाला*
*नाही कुणी शिपाई*
*झाली अनाथ आता*
*बाबा तुझी रिपाई*

पुरुषी अहंकाराने झपाटलेले लोक स्त्रीचे अस्तित्व नाकारतात.तिला अबला आणि दुर्बल समजून तिची अवहेलना करतात.पुरुषी मानसिकता ती चा जन्म नाकारतात. आपला जन्म आणि आपण कोणामुळे हे पुरुष विसरतात. या सर्व गोष्टीची कवीला चीड येते आणि ते असाह्य स्त्री या कवितेतून बोलते होतात.

नसती स्त्री तर
*थोर महात्मे कसे जन्मले असते*
*नारी जातीच्या असह्यतेला*
*पुरुष जात ही हसते*

या कविता संग्रहात एकूण अंशी कविता आहेत. यात राजे शाहू छत्रपती, विद्वानांचा धनी, हा सागरी किनारा,लोकशाही, स्वाभिमान, माता रमाई,पेन्शन, घोषणा या कवितांचा समावेश या कवितासंग्रहामध्ये आहे. कवी श्री. न. डोंगरे यांनी या कविता संग्रहाला दिलेल्या शीर्षकाची कविता, मसानातले दिवे या कवितेतून कवी व्यक्त होतो.

*गाव कुसाच्या बाहेर दिसती आमचे थवे*
*मसानातले दिवे आम्ही मसानातले दिवे*

कवी श्री. न. डोंगरे यांनी या कविता संग्रहाकरीता मसानातले दिवे या शीर्षकाची केलेली निवड योग्य आहे हे कविता संग्रह वाचल्यानंतर नक्कीच कळते. या कविता संग्रहाला मेघा पब्लिकेशनचे संजय महल्ले यांची अभ्यासपूर्ण प्रस्तावना असल्याने कविता संग्रह उंचावला आहे. मेघा पब्लिकेशन हाऊसने हा कविता संग्रह प्रकाशित केला आहे. कवी श्री. न.डोंगरे यांचे बंधू वासुदेव डोंगरे यांची मुखपृष्ठ संकल्पना बोलकी आहे.मसानातील दिवे या कविता संग्रहाचे प्रकाशन अमरावती येथे पार पडलेल्या, तिसरे परिवर्तनवादी आंबेडकरी साहित्य संमेलनात, संमेलनाध्यक्ष रमेश जीवने यांच्या हस्ते तसेच उद्घाटक आंबेडकरी साहित्यिक एन. व्हि. ढोके, स्वागताध्यक्ष माजी प्राचार्य गोपीचंद मेश्राम, प्रमुख पाहुणे डॉ रविकांत महिंदकर, आम्रपाली पारवे, धम्मपाल देशभ्रतार, मुख्य संयोजक, शब्दास्त्र प्रमुख प्रवीण कांबळे, संयोजक अविनाश गोंडाने, देवानंद पाटील, पद्माकर मांडवधरे, दिलीप शापामोहन, डॉ. नंदकिशोर दामोधरे, टी. एफ. दहीवडे, प्रा.अरुण बुंदिले, चरणदास नंदागवळी यांच्या उपस्थितीत पार पडले.

मसानातील दिवे या कविता संग्रहाचे रसिक आणि वाचक वर्ग निश्चितच स्वागत करतील या अपेक्षेसह कवी श्री. न. डोंगरे यांचे कविता संग्रहाकरिता अभिनंदन आणि शुभेच्छा.

---

कविता संग्रह
मसानातले दिवे
कवी श्री. न.डोंगरे
अमरावती
**संकलन :- अविनाश गोंडाणे**
अमरावती.
9923264193

■ ■ ■

# माणुसकी आणि मुखवटे

जीवनात प्रत्येकजण काही ना काही मुखवटा घालून जगत असतो-कधी आनंदाचा, कधी सद्गुणाचा, तर कधी प्रेमाचा. पण काळाच्या कसोटीवर जेव्हा प्रसंग येतात, तेव्हा हे मुखवटे आपोआप गळून पडतात आणि खरी ओळख उघडी पडते. तेव्हा कळतं-शब्द नव्हे, तर कृतीच माणसाचं खरं रूप दाखवते.

मुखवट्यांमागे लपलेली कृत्रिमता क्षणभर मोहक वाटते, पण सत्याचा प्रकाश पडताच ती नाहीशी होते. माणसाचं सौंदर्य शिक्षणात, संपत्तीत नव्हे-तर स्वभावात आणि सत्यात असते.

शिक्षणाच्या डिग्र्या माणसाला मान मिळवून देतात, पण खरी ओळख माणुसकीतूनच ठरते. डिग्र्या कितीही असल्या तरी जर माणुसकी नसेल, तर ते सर्व ज्ञान निरर्थक ठरते. कारण माणुसकी हीच खरी पदवी आहे जी आयुष्यभर आपल्याला सन्मानित ठेवीत असते.

आजच्या जगात माणूस शिक्षित झाला आहे, तंत्रज्ञानाच्या शिखरावर पोहोचला आहे, पण माणुसकी मात्र कुठेतरी मागे राहिली आहे. समाजात प्रत्येक जण काही ना काही मुखवटा घालून जगत आहे. कधी हसऱ्या चेहऱ्याचा, कधी नम्रतेचा, तर कधी दयाळूपणाचा. पण या मुखवट्यांच्या आड असलेला खरा चेहरा किती वेगळा असतो, हे समजायला फार वेळ लागत नाही.

माणुसकी म्हणजे फक्त मोठमोठी भाषणं नाहीत, ती म्हणजे दुसऱ्याच्या वेदनेत स्वतःचं मन ओलं करणं. कोणाचं दुःख पाहून थोडा आधार देणं, कुणाचं मन दुखावलं असेल तर नम्रपणे माफी मागणं हीच खरी माणुसकी. पण आज काळ बदलला आहे. लोकांच्या चेहऱ्यांवर बनावट हसू आणि मनात मत्सर, हे दृश्य आता नेहमीचं झालं आहे.

वेळ प्रसंगी मुखवटे गळून पडतात, आणि तेव्हाच समजतं की कोण खरं आणि कोण फक्त दिखावा करत होतं. माणुसकी जिथे असते, तिथे कोणतेही मुखवटे नसतात तिथे डोळ्यांत प्रामाणिकपणा असतो, आणि मनात प्रेमाचा ओलावा.

खरी श्रीमंती म्हणजे पैशांची नव्हे, तर माणुसकीची असते. पद, प्रतिष्ठा, ज्ञान, सत्ता हे सगळं क्षणभंगुर आहे; पण एखाद्याच्या मनात आपल्या वागणुकीने ठेवलेला आदर आणि प्रेम तेच कायम राहणारं अमूल्य धन असून माणुसकी जपली तर मुखवटे गरजेचेच राहत नाहीत.

कारण जिथे मन खरं असतं, तिथे चेहऱ्यावरचं हसूही खरं असतं. म्हणूनच, आपण सर्वांनी मुखवटे न घालता खऱ्या मनानं वागू या कारण जिथे माणुसकी असते, तिथे चेहरा नव्हे, तर मन बोलतं. शेवटी माणुसकी म्हणजे माणसाने माणसाशी सहानुभूती आणि आदराने वागणे. हाच माणुसकीचा खरा अर्थ आहे.

---

**जयप्रकाश बा. बानाईत**
**अमरावती.**
**9673432200**

■ ■ ■

# सिद्धरामय्या आणि शिवकुमार!



**अभय गोखले**

**पूर्वार्ध**

२०२३ साली कर्नाटकमध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपाचा पराभव करून, कॉंग्रेसने तेथील सत्ता काबीज केली. नोव्हेंबर २०२५ मध्ये सिद्धरामय्या यांच्या नेतृत्वाखालील सरकारने आपली अडीच वर्षे पूर्ण केली.

कर्नाटक सरकारमधील ज्येष्ठ मंत्री आणि २०२३ मधील कॉंग्रेसच्या विजयाचे प्रमुख शिल्पकार डी. के. शिवकुमार यांनी असा दावा केला आहे की, सिद्धरामय्या यांनी २०२३ मध्ये जेंव्हा मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली तेंव्हा असे ठरले होते की पहिली अडीच वर्षे सिद्धरामय्या हे मुख्यमंत्रीपदी राहतील आणि त्यानंतर उरलेली अडीच वर्षे डी.के.शिवकुमार हे मुख्यमंत्री पदाचा कार्यभार सांभाळतील.यातील खरे - खोटे हे सिद्धरामय्या आणि डी.के.शिवकुमार यांनाच माहिती असणार.

सिद्धरामय्या यांच्या मुख्यमंत्री पदाचा अडीच वर्षांचा कार्यकाल संपत आलेला असतानाच शिवकुमार यांच्या पाठिराख्यांनी, आता सिद्धरामय्या यांनी मुख्यमंत्री पदाचा राजीनामा देऊन, शिवकुमार यांच्याकडे मुख्यमंत्रीपद सोपवावे अशी अप्रत्यक्षरित्या मागणी सुरू केली होती. शिवकुमार हे जरी उघडपणे तशी मागणी करत नव्हते तरी आपल्या पाठिराख्यांच्या मुखातून ती मागणी वदवून घेत होते. कॉंग्रेस नेतृत्वाने जरी सुरूवातीला तिकडे गंभीरपणे लक्ष दिले नाही तरी मागणीचा जोर वाढल्यानंतर, कॉंग्रेस नेतृत्वाला तिकडे गंभीरपणे लक्ष देणे भाग पडले आहे.

सिद्दरामय्या आणि शिवकुमार यांच्यातील शीतयुद्धात कॉंग्रेस नेतृत्वाचे सॅन्डविच झाले आहे.सिद्दरामय्या आणि डी. के. शिवकुमार हे कॉंग्रेसचे कर्नाटक मधील मासबेस असलेले नेते आहेत. शिवकुमार यांची कर्नाटकमध्ये मोठ्या प्रमाणात असलेल्या व्होक्कालिग या समाजावर चांगली पकड आहे, तर सिद्धरामय्या यांनी 'अहिंदा' हे समिकरण तयार केले आहे. अहिंदा याचा कन्नड भाषेत अल्पसंख्य, मागासवर्ग आणि दलित असा अर्थ आहे. या समिकरणाच्या सहाय्याने, सिद्धरामय्या यांनी आपल्या पक्षाला निवडणुकीत विजय मिळवून देण्यात मोलाचा वाटा उचलला आहे.

२०२३ मध्ये झालेल्या कर्नाटक विधानसभा निवडणुकीत, विधानसभेच्या एकूण २२४ जागांपैकी १३५ जागा जिंकून कॉंग्रेसने चांगली कामगिरी केली होती.

उभाजपाची मोठ्या प्रमाणात घसरगुंडी होऊन, पक्षाला फक्त ६६ जागांवर समाधान मानावे लागले होते.कुमारस्वामी यांच्या नेतृत्वाखालील सेक्युलर जनता दलाला तर केवळ १९ जागा जिंकता आल्या होत्या. अशा मजबूत परिस्थितीत सिद्धरामय्या हे कर्नाटकचे मुख्यमंत्री बनले होते.

सुरूवातीला सिद्दरामय्या आणि शिवकुमार यांच्यातील संबंध व्यवस्थित होते.परंतु सिद्दरामय्या यांच्या मुख्यमंत्री पदाच्या कारकीर्दीला जसजशी अडीच वर्षे पूर्ण होत आली तसतशी शिवकुमार यांच्या पाठिराख्यांनी नेतृत्वबदलाची मागणी उचलून धरली.

कॉंग्रेस नेतृत्वाने सिद्दरामय्या आणि शिवकुमार यांना एकत्र बसून आपापसातील वाद मिटविण्याची सूचना केली होती. त्यानुसार सिद्दरामय्या यांनी शिवकुमार यांना आपल्या घरी नाश्त्याला बोलावून, त्यांच्याशी चर्चा केली आणि आपल्यात कोणतेही मतभेद नसल्याचे दोघांनी जाहीर केले.

मुख्यमंत्री पदाच्या बाबतीत कॉंग्रेसचे नेतृत्व जो निर्णय घेईल तो आम्हाला मान्य असेल, असे दोघांनी कबूल केले. अर्थात हे सर्व मिडियासाठी होते. खरी गोष्ट अशी आहे की सिद्दरामय्या हे आपले पद सुखासुखी सोडणार नाहीत आणि शिवकुमार हे आपल्या पाठिराख्यांच्या माध्यमातून सिद्दरामय्या यांना त्रास देणे सोडणार नाहीत.

त्यामुळे कॉंग्रेस नेतृत्वाला त्या बाबतीत लवकरात लवकर निर्णय घ्यावाच लागेल, नाही तर त्याचा विपरीत परिणाम कर्नाटकमध्ये लवकरच होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतील कॉंग्रेसच्या कामगिरीवर होऊ शकेल.

---

(उर्वरीत भाग उद्याच्या अंकात)

■ ■ ■

# हळद जास्त पोटात गेली तर किडनी आणि लिव्हर फेल?



भारतीय आहार आणि आयुर्वेदिक उपचारात एक महत्वाचा मसाला आणि औषध म्हणून वापरली जात असलेली हळद प्रसिद्ध आहे. आयुर्वेदात हळद ही सर्वाधिक फायद्याची म्हटली जाते.

यातील एक कंपाऊंड असते करक्युमिन जे हळदीचा सर्वात मोठी ताकद असते. या सूजविरोधी आणि एंटीऑक्सीडेंट गुणांसाठीही ओळखले जाते. यामुळे कोणतीही जखम झाल्यानंतर हळदीचे दूध पिण्याचा सल्ला दिला जातो.परंतू हळदीचे अधिक प्रमाणात सेवन केले तर लिव्हर आणि किडनीच्या आरोग्यासाठी ते नुकसान कारक असते.

नॅशनल इन्स्टीट्यूट ऑफ मेडिसिनच्या रिसर्चनुसार हळदीतील ऑक्सलेट जास्त असल्याने ते लघवीतील ऑक्सलेट वाढवते. त्यामुळे कॅल्शियम ऑक्सलेट किडनी स्टोनची जोखीम वाढते. ही समस्या त्या लोकात आणखी गंभीर होऊ शकते ज्यांना आधीच स्टोनचा प्रॉब्लेम झालेला आहे.

.अन्य एका बातमीननुसार प्रदीर्घ काळ दुसरी औषधे वा आजारांसोबत हळद वा कर्क्युमिन सप्लीमेंटचा हेव्ही डोस घेतल्याने काही लोकांमध्ये ऑक्सलेट नेफ्रोपॅथी (किडनीला नुकसान ) सारख्या केस समोर येतात.

**लिव्हरवर वाईट परिणाम केव्हा ?**

नॅशनल इन्स्टीट्यूट ऑफ मेडिसिनच्या संशोधनानुसार सामान्य डाएटमध्ये हळद सर्वसामान्यपणे सुरक्षित आणि अनेक वेळा लिव्हरच्या सूजेवर फायदेमंद मानले जाते. परंतू गेल्या काही वर्षांत लोकांनी हळद किंवा कर्क्युमिन सप्लीमेंटचे अधिक प्रमाण घेण्यास सुरु केले आहे. बातमीनुसार अशा लोकात १ ते ४ महिन्यात इंटेन्स ड्रग - इंड्यूस्ड लिव्हर इंज्युरी, लिव्हर फेल आणि कधी-कधी हेपाटो-रेनल सिंड्रोम पाहिला गेला आहे.

**हळदीचे सुरक्षित प्रमाण आणि सुरक्षितता**

जर एखाद्या व्यक्तीचे वजन 60 ते 70 किलो असेल तर त्याने 200 mg प्रतिदिन हून अधिक कर्क्युमिन घेऊ नये. जर भारतीयांच्या डाएटच्या विचार केला तर सामान्य भारतीयांच्या डाएटमध्ये 2–2.5 g हळदीतून केवळ 60–100 mg कर्क्यूमिन मिळते. जेवण बनवताना रोज अर्धा चमचा वा एक चमचा हळद सर्वसाधारणपणे सुरक्षित आहे. जर किडनी - लिव्हरचा काही गंभीर त्रास असायला नको.

■ ■ ■

## अशोकायन

**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**



### दिल थामके बैठो ..!

**झालं गेलं पार पडलं**
**एकदाचं भौ मतदान**
**इव्हीएम मध्ये दडलय काय**
**चर्चेला आलयं उधाण ..**

**पारावरच्या चिलमी गप्पा**
**भलत्याच रंगताहेत**
**मिशीवर ताव देऊन**
**शर्यती लावताहेत .. !**

**जो तो म्हणतो आमचाच**
**उमेदवार निवडून येणार**
**किसमे कितना दमचा**
**२१ ला पदार्फाश होणार ..!**

# दत्तजयंती उपासना

**वाचक लिहितात**

दत्ताचिया भक्ता नाही भय चिंता हे सुवचन ऐकून भक्ताचे मन निश्चिन्त होते. मार्गशीर्ष पौर्णिमेच्या दिवशी मृग नक्षत्रावर संध्याकाळच्या वेळी भगवान दत्तांचा जन्म झाला, म्हणून या दिवशी सर्व दत्तक्षेत्रांमध्ये भगवान दत्तात्रेय यांचा जन्मोत्सव साजरा केला जातो.

दत्त जयंतीच्या दिवशी दत्त-तत्त्व पृथ्वीवर नेहमीपेक्षा १००० पट अधिक कार्यरत असते. या दिवशी श्री गुरुदेव दत्त या नामजपासह भक्तिभावाने पूजा केल्यास दत्त-तत्त्वाचा अधिकाधिक लाभ होण्यास मदत होते.

दत्तजयंतीच्या दिवशी भगवान दत्तांचा नामजप, प्रार्थना, भावपूर्ण पूजा आणि आरती करण्यानेही पुष्कळ मोठ्या प्रमाणात दत्त तत्त्व आपल्याला मिळते.

सौ. आदिती अमित देखणे, नवीन पनवेल.

# कोण उधळणार गुलाल अन् कुणाच्या हातात राहणार सत्ता?

## नगरपरिषद मतमोजणीला ब्रेक लागल्याने 18 दिवस चालेल आकडेमोड

### 21 डिसेंबर पर्यंत प्रशासन अलर्ट मोडवर

**बादल डकरे**

**चांदूर बाजार,( दि.3 )** – नगरपरिषद/ नगरपंचायत निवडणुकांबाबत नागपूर खंडपीठाने दिलेल्या आदेशामुळे मतमोजणी 18 दिवस पुढे ढकलण्यात आली आहे. त्यामुळे आधीच तणावाखाली असलेल्या उमेदवारांची धावपळ आणखी वाढली आहे. मंगळवारी चांदूरबाजार नगरपरिषदेकरिता मतदान झाले. या निवडणुकांचे निकाल 3 डिसेंबर रोजी जाहीर होणार होते; मात्र उच्च न्यायालयाच्या आदेशामुळे आता सर्वांचे निकाल 21 डिसेंबर रोजी एकाच दिवशी घोषित केले जाणार आहेत.

राज्य निवडणूक आयोगाच्या मूळ कार्यक्रमानुसार निवडणुका पार पडल्या असल्या तरी जिल्ह्यासह चांदूरबाजार नगरपरिषदेचा निकाल आता 21 डिसेंबरलाच लागणार आहे. त्यामुळे नगराध्यक्ष, नगरसेवक आणि सर्व उमेदवारांसाठी प्रतीक्षेचा कालावधी तब्बल 18 दिवसांनी वाढला आहे. मतदान यंत्रणा स्ट्राँग रूममध्ये सुरक्षित ठेवली असली, तरी इतका मोठा अवधी प्रतीक्षेत घालवावा लागणार असल्याने उमेदवार व कार्यकर्त्यांची धडधड वाढली आहे. विजयाचा गुलाल उधळण्याची उत्सुकता आता 21 डिसेंबरपर्यंत थांबवावी लागणार आहे.



### शंकेची छाया आणि 'अदृश्य दबाव'

चांदूरबाजार शहरात रोजच समर्थकांकडून आपण आघाडीवर आहोत का? असा प्रश्न उमेदवारांना पडत आहे. त्यात सोशल मीडियावरील अफवा उमेदवारांची धडधड वाढवू शकतात. स्ट्राँग रूममधील मशीन सुरक्षित आहेत ना? कोणी त्यात फेरफार तर करणार नाही ना? अशा शंका प्रत्येक उमेदवाराच्या मनात कायम घोंघावत राहणार यात शंका नाही. पुढील 18 दिवस हे उमेदवारांच्या संयमाची खरी परीक्षा ठरणार आहेत.

### उमेदवारांची 'घालमेल', अनिश्चिततेचा ताण

मतदानानंतर रोज नवे चर्चेचे फेरे सुरू आहेत. कोणत्या बूथवर किती मतदान झाले? कोणत्या भागात कोण आघाडीवर आहे? कार्यकर्त्यांकडून मिळणाऱ्या 'गुप्त' माहितींवरून निष्कर्ष काढण्याचा प्रयत्न हे सर्व पुढील 18 दिवस सुरू राहणार आहे.

### 18 दिवस 'खडा पहारा' द्यावा लागणार

या निर्णयामुळे प्रशासकीय यंत्रणेची डोकेदुखी वाढली आहे. स्ट्राँग रूममध्ये मतदान यंत्रे सुरक्षित ठेवण्यासाठी पोलिसांना अखंड, सतर्क आणि कडेकोट बंदोबस्त करावा लागणार आहे. साधारणतः मतमोजणीपर्यंत दोन–तीन दिवसांची सुरक्षा पुरेशी ठरते; मात्र यावेळी तब्बल 18–19 दिवस पोलिसांचा 'खडा पहारा' कायम ठेवावा लागणार आहे. उमेदवार आणि त्यांचे प्रतिनिधी यांनाही स्ट्राँग रूमच्या सुरक्षेवर लक्ष ठेवण्यासाठी वारंवार भेट द्यावी लागेल. परिणामी निवडणूक विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्यावर अतिरिक्त जबाबदाऱ्या वाढणार आहेत.

# शाळेच्या परिसरातील वाढलेल्या झुडूंपांमूळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला धोका

### शिक्षण विभागाने तातडीने कारवाई करावी; ग्रामस्थांनी मागणी

महासागर | प्रतिनिधी

**वरुड, ( दि.3 )**– पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या नागझिरी जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळेच्या परिसरात अनियमितपणे वाढलेल्या झुडपांमुळे तसेच लावण्यात आलेल्या विविध पिकांमुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. शाळेत पारस बागेच्या नावाखाली पालक, सांबार, तूर, पोपटीचा वेल, ज्वारी, मिरची, वांगी यांसारखी पिके शाळेच्या आवारातच फुलविल्याने संपूर्ण परिसराला शेतीचे स्वरूप आले आहे, मात्र सरपटणाऱ्या प्राण्यामूळे ते आता धोकादायक ठरत आहे.

अतिवाढलेल्या वनस्पतींमध्ये सरपटणारे प्राणी दिसू लागल्याने विद्यार्थ्यांच्या जीवितास थेट धोका निर्माण झाल्याची चिंता पालकांनी व्यक्त केली. शाळेच्या मूलभूत सुरक्षिततेकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोपही ग्रामस्थांनी केला आहे. या पार्श्वभूमीवर शाळा व्यवस्थापन समिती आणि पंचायत समितीच्या शिक्षण विभागाने या गंभीर समस्येकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी केली आहे. परिसरातील झुडपे हटवून शाळेला सुरक्षित वातावरण उपलब्ध करून द्यावे, यासाठी विवेश पन्नासे, सारंग गलबले, करण ऊईके, दीपक बरगट, रोशन लोणारे, मोहन मरसकोल्हे, भावेश लोणारे, नयन युवनाते, कमलेश ऊईके, विजय पाचपोहर यांच्यासह ग्रामस्थांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. ग्रामस्थांचे म्हणणे आहे की, शाळा हे मुलांसाठी सर्वात सुरक्षित ठिकाण असावे; मात्र सध्याची परिस्थिती धोकादायक असून तातडीची कारवाई अपरिहार्य आहे.

संबंधित विभागाने त्वरित स्वच्छता मोहीम राबवून विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेची खात्री द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.



# 'संताजी जगनाडे महाराज संतत्व व कवित्व' ग्रंथाचा प्रकाशन सोहळा

### संताजी जगनाडे महाराज जयंती पर्वानिमित्त आयोजन

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती,( दि.3 )** – संताजी जगनाडे महाराज यांच्या जयंती पर्वानिमित्त 'संताजी जगनाडे महाराज संतत्व व कवित्व' या ग्रंथाचा प्रकाशन सोहळा सोमवार, 8 डिसेंबर 2025 रोजी सकाळी 11 वाजता आयोजित करण्यात आला आहे. या ग्रंथाचे प्रकाशन डॉ. वसंतराव जामोदे (माजी उपकुलगुरू, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ) यांच्या हस्ते होणार आहे. जुना बायपास एमआयडीसी मार्गावर हॉटेल लॉर्डच्या पाठीमागे असलेल्या संताजी भवन मध्ये या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला प्रमूख मान्यवर म्हणून शंकरराव हिंगासपुरे, रंगराव भागवत, रंगराव मानापुरे, रामेश्वर गोदे, अण्णासाहेब नालसे यांच्या सह अन्य गणमान्य व्यक्ती उपस्थित राहतील. समाजातील सर्व बांधवांनी उपस्थित राहून या महत्त्वपूर्ण साहित्यिक उपक्रमाला आपला सहभाग द्यावा, असे आवाहन संताजी सेना बहुउद्देशीय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अरुण रा. गासे यांनी केले आहे.



# अंजनगाव-बोराळा-शिंदी रस्त्याच्या दुरुस्तीसाठी 1 जानेवारीपासून आंदोलन?

### ओबीसी बहुजन आघाडीचा इशारा




महासागर | प्रतिनिधी

**अंजनगाव सुर्जी, ( दि.3 )** – अंजनगाव–बोराळा–शिंदी रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था तातडीने सुधारावी, या मागणीसाठी ओबीसी बहुजन आघाडीने आक्रमक पवित्रा घेतला आहे. रस्त्याची दुर्दशा आणि वाढत्या अपघातांची गंभीर दखल घेत 1 जानेवारीपासून आंदोलनाचा इशारा दिला आहे. या करिता आमदार गजानन लवटे, तहसीलदार तसेच अंजनगाव पोलिस स्टेशनला निवेदन सादर केले.

सदर रस्ता खड्डयांनी भरून गेला असून अनेक ठिकाणी दगडांचा ढिगारा व पाण्याचे डबके कायम स्वरूपी साचले आहेत. यामुळे नागरिक, शालेय विद्यार्थी, शेतकरी व व्यापाऱ्यांना प्रचंड शारीरिक, मानसिक आणि आर्थिक त्रास सहन करावा लागत आहे. पावसाळ्यात डांबर पूर्णपणे उखडत असल्याने चिखलाचे साम्राज्य निर्माण होते आणि अपघाताची भीती अधिक वाढते. निवेदनात म्हटले आहे की, खराब रस्त्यामुळे दुचाकी–चारचाकी वाहनांचे मोठे नुकसान होत आहे. टायर पंक्चर, सस्पेन्शन बिघाड, पाठीचे दुखणे अशी अनेक संकटे नागरिकांवर ओढावली आहेत. त्यामुळे संपूर्ण रस्त्याचे तातडीने नूतनीकरण करणे अत्यावश्यक असल्याची मागणी करण्यात आली आहे.

प्रशासनाने तातडीने काम सुरू न केल्यास 1 जानेवारी 2026 पासून अंजनगाव–बोराळा–शिंदी रस्त्यावर लोकशाही मार्गाने जनआंदोलन छेडण्याचा इशारा आघाडीने दिला आहे. या आंदोलनाची संपूर्ण जबाबदारी प्रशासनावर राहील, असे प्रवीण पेटकर, जयेंद्र गाडगे, चंद्रशेखर देशमुख, सुरज पवार व मुकेश वानरे यांनी निवेदनातून म्हटले नमूद केले आहे.

# घोडे सर अकॅडमीमध्ये संविधान दिनानिमित्त व्याख्यानमाला

**चांदूर रेल्वे** – रामनगर येथील घोडे सर अकॅडमीमध्ये संविधान दिनानिमित्त व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून झाली. अकॅडमीचे संस्थापक व संचालक अंकुश घोडे यांनी संविधान दिनाचे महत्त्व, विद्यार्थ्यांमध्ये संविधानिक मूल्यांची जडणघडण आणि सुजाण नागरिक घडविण्यात शिक्षणाची भूमिका यावर मार्गदर्शन केले. प्रमुख वक्ते आकाश मोटघरे यांनी भारतीय संविधानाची निर्मिती, त्याची वैशिष्ट्ये, मूलभूत अधिकार–कर्तव्ये आणि लोकशाही तत्त्वांची सुस्पष्ट माहिती विद्यार्थ्यांना दिली. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी संविधानाचे प्रास्ताविक सामूहिकरीत्या वाचून लोकशाही मूल्यांचे पालन करण्याची शपथ घेतली. शिक्षक व विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवला.

### आज दत्त जयंती ; विविध भक्तीमय कार्यक्रमांचे आयोजन

**अमरावती** – शहरासह जिल्ह्यात गुरूवारी (दि. 4 डिसेंबर) दत्त जयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जाणार आहे. शहरातील विविध दत्त मंदिरांमध्ये तसेच भक्तांच्या घरोघरी आरती, अभिषेक, पालखी सोहळा आणि श्रीगुरूचरित्र पारायणाने भक्तिमय वातावरण निर्माण होणार आहे. मार्गशीर्ष महिन्यातील पौर्णिमेला साजरी होणारी ही जयंती यंदा गुरूवारी येऊन विशेष महत्त्वाची ठरली आहे. दत्तगुरूंचा जन्म संध्याकाळी प्रदोषकाळात झाला असल्याने उत्सव संध्याकाळी विशेष विधीने आयोजित केला जातो. या दिवशी दत्ततत्त्वाची उपासना केल्यास आध्यात्मिक लाभ आणि पुण्य फल प्राप्त होते, असे धार्मिक शास्त्र सांगते. पूर्वीच्या काळात पृथ्वीतलावर वाढलेल्या आसुरी शक्तींवर विजय मिळवण्यासाठी ब्रह्मदेवाच्या आदेशानुसार दत्तदेव विविध रूपांत अवतरित झाले. त्यामुळे दत्तजयंतीला दत्ततत्त्व अधिक प्रभावीपणे कार्यरत राहते.

# रायसाहेब मोती संगई इंग्लिश स्कूलमध्ये संविधान दिन

### संविधानाबद्दल विविध जागरूकता वाढविण्यासाठी विविध उपक्रम

महासागर | प्रतिनिधी

**अंजनगाव सुर्जी, ( दि.3 )** – सीताबाई संगई एज्युकेशन सोसायटीच्या रायसाहेब मोती संगई इंग्लिश स्कूलमध्ये 26 नोव्हेंबर 2025 रोजी संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात सामाजिक विज्ञान विषयाचे शिक्षक विशाल व्यवहारे यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय संविधानाच्या उद्देशपत्रिकेच्या सामूहिक वाचनाने झाली. उद्देशपत्रिकेचे वाचन करताना विद्यार्थ्यांनी संविधानातील मूलभूत तत्त्वे समजून घेण्याचा प्रयत्न केला.

यानिमित्त विद्यार्थ्यांमध्ये संविधानाबद्दल जागरूकता वाढविण्यासाठी प्रश्नमंजुषा, संविधान रॅली, शिक्षक–विद्यार्थी मानवी साखळी, प्रेरणादायी पोस्टर्स, तसेच सेल्फी पॉईंट अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या सर्व उपक्रमांमुळे लोकशाही मूल्यांची जाणीव अधिक दृढ होण्यास मदत होईल, असे मत शाळेच्या मुख्याध्यापिका अंशुजा तळणकर यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन व मार्गदर्शनासाठी उपमुख्याध्यापिका विश्वजा दर्यापूरकर आणि समन्वयिका सांत्वना कथे यांचे विशेष योगदान लाभले. कार्यक्रमात विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत संविधान दिनाला खऱ्या अर्थाने मान्यता दिली.



# दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी उपक्रमांची रेलचेल




महासागर | प्रतिनिधी

**चांदूर रेल्वे,( दि.3 )**– जागतिक दिव्यांग दिनानिमित्त समता सप्ताहाची सुरुवात माध्यमिक विद्यालय पळसखेड केंद्र शाळा कवठा कडू येथे लुईस ब्रेल यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली. दिव्यांग विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वितरण करून त्यांच्या जिद्दीचा गौरव करण्यात आला. शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणाऱ्या पालकांसह विद्यार्थ्यांना घडविणाऱ्या वर्गशिक्षकांचा विशेष सत्कारही करण्यात आला.

### समता सप्ताहास प्रारंभ

कार्यक्रमास गटसमनायक मंगेश उल्हे, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक संजय शेलोकर, प्राचार्य पंजाब चिरमाडे, विशेष शिक्षक अनिल गोंडसे, रणजीत राजुरकर, श्रीकृष्ण हिवराळे तसेच विशेष शिक्षिका अश्विनी पोकळे व दीपमाला कुमरे उपस्थित होते. मान्यवरांनी दिव्यांग विद्यार्थ्यांच्या जिद्द, आत्मविश्वास आणि प्रगतीचे कौतुक करत दिव्यांग विद्यार्थी आपल्या क्षमतांच्या जोरावर समाजात उल्लेखनीय यश मिळवत आहेत, असे सांगितले. लुईस ब्रेल यांच्या कार्याची आणि संघर्षमय जीवनाची माहिती देत विद्यार्थ्यांनी त्यातून प्रेरणा घ्यावी, असे आवाहन करण्यात आले. समता सप्ताहात ष्ठद्बष्ठ ष्टड्डह्म्श्व–चड्ड्ढष्ट व नवीन नोंदणी कॅम्प, न्यूरोथेरपी शिबिर, पालक भेट, चर्चासत्र तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती विशेष शिक्षक अनिल गोंडसे यांनी दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजय राऊत यांनी तर आभार प्रदर्शन संदीप याउल यांनी केले. दिव्यांग विद्यार्थी व पालकांची उपस्थिती उत्साहवर्धक होती.

## हंगाम आला रे आला....

# पुन्हा तुरीच्या सोल्यांची मोहिनी

### ग्रामीण भागात 'सोल्यांच्या हंगामाला' उधाण ◆ घराघरांतील स्वयंपाक घरात सोल्यांवर प्रयोग सुरु



**नितीन दुर्बूडे**

**पथ्रोट,( दि.3 )** – दिवाळीची चाहूल संपताच शेतशिवारातील तुरीचे पिक रंगत जाते आहे. तुरीच्या झाडावरील पिवळ्याधम्म फुलोऱ्याने परिसर उजळून निघाला असून ग्रामीण भागासह शहरवासीयांचेही लक्ष या हंगामी पिकाकडे वेधले गेले आहे. तुरीच्या शेंगांतील रसाळ, ओल्या दाण्यांच्या भाजीस ग्रामीण भागात 'सोले' म्हणून ओळखले जाते. सध्या घराघरांत तुरीच्या सोल्यांची भाजी, सोल्यांचे विविध प्रकार आणि पारंपरिक मेनूला मोठी मागणी दिसून येते. खवय्येही या खास चवीच्या पदार्थांचा मनमुराद आस्वाद घेत आहेत.





### तुरिचे पौष्टिक हंगामी वरदान

भारतीय स्वयंपाकातील महत्त्वाची शेंग म्हणून तुरीची शेंग ओळखली जाते. चव, पौष्टिकता आणि पारंपरिक महत्त्व यामुळे थंडीच्या दिवसांत या शेंगांचे सेवन अधिक वाढते. वाफाळती सोल्यांची भाजी असो, किंवा फक्त शेंगा वाफवून खाणे असो, तुरिची शेंग शरीराला उष्णता, तंदुरुस्ती आणि ऊर्जा देणारे समृद्ध पोषण प्रदान करते.

### 'तुरीचे झाडणे' एक जिव्हाळ्याची परंपरा

ग्रामीण भागात सोल्यांच्या हंगामात 'तुरीचे झाडणे' हा खास प्रघात दिसून येतो. काही महिला थेट शेतात जाऊन शेंगा तोडताना दिसतात, तर पुरुष मंडळी झाडाच्या डहाळ्या तोडून घरात आणतात, यालाच झाडणे म्हणतात. गावातून शहरातील नातेवाईकांना फक्त शेंगा न पाठवता झाडणे पाठविण्याची मनोहर परंपरा आजही कायम आहे. नातेसंबंधातील कृतज्ञता आणि जिव्हाळा व्यक्त करण्याचे हे एक सुंदर माध्यम मानले जाते. तुरीच्या सोल्यांच्या सुगंधाने ग्रामीण भाग दुमदुमला असताना, या पारंपरिक चवीचे आकर्षण पुढील काही आठवड्यांत अधिक वाढणार आहे, यात शंका नाही.

### हिवाळी भाज्यांच्या बाजारात 'तुरीची शेंग' ठरते आकर्षण

हेमंत ऋतूपासून बाजारात विविध हंगामी भाज्या दाखल होतात— वाल, पोपट, राजमा, चितरंग वाल, वाटाणा यांसह तुरीची शेंगही आपले विशेष स्थान राखून असते. पूर्वी गावांमध्ये भाजीपाल्याची उपलब्धता कमी असल्याने, शेतातील हंगामी पिकांपासून तयार होणाऱ्या दाण्यांच्या भाज्यांचा प्रघात पडला. आजही ही परंपरा तितक्याच उत्साहात जोपासली जात आहे.




# दर्यापूरमध्ये 68.7 टक्के मतदान

### जिल्हाधिकारी येरेकर यांची प्रभाग 8 ला भेट

महासागर | प्रतिनिधी

**दर्यापूर, ( दि. 3 )**–दर्यापूर नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक 2025 शांततेत आणि उत्साहात पार पडली. प्रशासनाच्या काटेकोर नियोजनासह नागरिकांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवून लोकशाहीचा उत्सव साजरा केला. नगरपरिषद क्षेत्रात 36,571 पैकी 25,108 मतदारांनी मतदान करत 68.7 टक्के मतदान झाले. यामध्ये पुरुष 13,112 तर महिला 11,996 मतदारांचा समावेश होता.

मतदान प्रक्रियेचा आढावा घेण्यासाठी अमरावतीचे जिल्हाधिकारी आशीष येरेकर यांनी प्रभाग क्रमांक 8 मधील मतदान केंद्राला भेट दिली. त्यांनी सुविधांची पाहणी करत मतदान व्यवस्थेबाबत समाधान व्यक्त केले. सकाळपासूनच केंद्रांवर मतदारांची मोठी गर्दी दिसून आली. तरुणांसह सर्वच वयोगटातील नागरिकांनी शांततेत नियमांचे पालन करून मतदान केले.

### निवडणूक व्यवस्थेची भक्कम आखणी

निवडणूक सुरळीत पार पाडण्यासाठी प्रशासनाने सशक्त यंत्रणा उभारली होती. ज्यामध्ये 39 मतदान केंद्र, 156 पोलिंग बूथ कर्मचारी, 50 पोलीस कर्मचारी, 3 स्थिर पथक, 2 फिरते पथक, 3 व्हिडिओ सर्व्हिलन्स टीम,2 राखीव टीम, 6 मतमोजणी टेबल, 5 क्षेत्रीय अधिकारी, 2 रिझर्व्ह अधिकारी, 68 मतमोजणी कर्मचारी, 39 कंट्रोल युनिट, 75 बॅलेट युनिट तसेच दिव्यांग, जेष्ठ आणि महिला मतदारांसाठी विशेष सुविधांचीही व्यवस्था करण्यात आली होती.


**जाहिरात**

जन्म प्रमाण पत्र मिळने बाबत शमीम बानो शेख अब्बास रा. कळमखार ता. धारणी यांचा जन्म दिनांक 02/05/1978 रोजी गांव कळमखार ता. धारणी येथे झालेला आहे. या बाबत ग्राम पंचायतमध्ये नोंद नाही परंतु यांना जन्म दाखल्याची आवश्यकता आहे. करिता कोनाला या बाबत आक्षेप असल्यास त्यांनी 30 दिवसात आक्षेप दाखल करावे. सदर प्रसिद्धि ग्रामपंचायत कळमखार ता. धारणी येथे नोटिस बोर्ड वर लावण्यात आली आहे.

**शमीम बानो शेख अब्बास**

**जाहिरात**

जन्म प्रमाण पत्र मिळने बाबत मलेका कौसर जमील खान रा. कळमखार ता. धारणी यांचा जन्म दिनांक 17/11/2000 रोजी गांव कळमखार ता. धारणी येथे झालेला आहे. या बाबत ग्राम पंचायतमध्ये नोंद नाही परंतु यांना जन्म दाखल्याची आवश्यकता आहे. करिता कोनाला या बाबत आक्षेप असल्यास त्यांनी 30 दिवसात आक्षेप दाखल करावे. सदर प्रसिद्धि ग्रामपंचायत कळमखार ता. धारणी येथे नोटिस बोर्ड वर लावण्यात आली आहे.

**मलेका कौसर जमील खान**



RNINO-46975/1985 Dainik Mahasagar Amravati

Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak; printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Hotel Tourist Beside Railway Station square, Amravati. Amravati head office, address: Dainik Mahasagar, Hotel Tourist beside Railway Station square, Amravati, phone no. 9518934504.
Group Editor-in-Chief and Managing Director- Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - Sandeep Ramrao Kale, Managing Editor - Pankaj Shrikrishna Chandak

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, हॉटेल टुरिस्टच्या बाजूला, रेल्वे स्टेशन चौक, अमरावती, येथे प्रकाशित केले. मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक

# अस्मिता

## झटपट बनवा मिनी सोया डोसा



रसगंधा

घरात इडली-डोशाचं पीठ नसलं तरी तुम्ही डोसा बनवू शकता. कणीक आणि सोया मिल्कचा वापर करून मिनी सोया डोसा बनवता येईल. रविवारी संध्याकाळी किंवा सकाळी न्याहरीलाही हा डोसा बनवता येईल.

**साहित्य:** पाव कप कणीक, एक कप सोया मिल्क, दोन हिरव्या मिरच्या, बारीक चिरलेला कांदा, थोडी कोथिंबिर, पाव चमचा बेकिंग सोडा, मीठ आणि तेल.

**कृती :** गॅसवर डोसा तवा किंवा नॉन स्टीक पॅन ठेवा. त्यात थोडं तेल घाला. तवा गरम झाल्यावर त्यावर डोशाचं पीठ घालून गोलाकार पसरून घ्या. एक बाजू भाजली गेली की उलटून दुसरी बाजू भाजून घ्या. तुमचा मिनी सोया डोसा तयार आहे. चटणी, सांबार किंवा सॉससोबत खायला द्या.

**अभ्यासादरम्यान पूर्णिमादेवी यांना समजले की ग्रेटर अ‍ॅडजुटंट स्टॉर्क म्हणजेच हर्गिला नावाचा दुर्मिळ पक्षी नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. त्याला विशेष महत्त्व असूनही लोकांमध्ये याबाबत भीती आणि अंधश्रद्धा आहे. पूर्णिमा यांनी या पक्ष्याचे संरक्षण करायचे असे ठरवले. अर्थात फक्त संशोधन करून काही साध्य होणार नाही हे त्यांना माहीत होते. त्यामुळे त्यांनी विशेषतः आसाममधील स्थानिक महिलांना आणि गृहिणींना एकत्र केले आणि हर्गिला आर्मी नावाची महिलांची संघटना तयार केली.**

## पक्षीसंवर्धिका

मानिनी

पूर्णिमादेवी बर्मन या आसाममधील प्रसिद्ध जीवशास्त्रज्ञ आणि वन्यजीव संवर्धक आहेत. त्यांचा जन्म आसाममधील एका साध्या कुटुंबात झाला. लहानपणीच निसर्ग, पक्षी आणि वन्यजीव यांच्याविषयीची ओढ त्यांच्यात निर्माण झाली होती. त्यांनी गुवाहाटी विद्यापीठातून जीवशास्त्रात शिक्षण घेतले आणि पुढे पर्यावरण संवर्धन क्षेत्रात संशोधन सुरू केले. अभ्यासादरम्यान त्यांना समजले की ग्रेटर अ‍ॅडजुटंट स्टॉर्क म्हणजेच हर्गिला नावाचा दुर्मिळ पक्षी नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. या पक्ष्याला भारतात विशेष महत्त्व असूनही लोकांमध्ये याबाबत भीती आणि अंधश्रद्धा आहे. पूर्णिमा यांनी या पक्ष्याचे संरक्षण करायचे असे ठरवले. अर्थात फक्त संशोधन करून काही साध्य होणार नाही हे त्यांना माहीत होते. त्यामुळे त्यांनी विशेषतः आसाममधील स्थानिक महिलांना आणि गृहिणींना एकत्र केले आणि हर्गिला आर्मी नावाची महिलांची संघटना तयार केली. या समूहाने झाडांवरची पक्ष्यांची घरटी तोडली जाणार नाहीत, खाली पडलेली पिले वाचवली जातील आणि गावातील लोकांमध्ये जागृती केली जाईल असा संकल्प केला. या पक्ष्यांमुळे पर्यावरणाचे कशा प्रकारे संतुलन राखले जाते, हे त्यांनी लोकांना समजावून सांगितले. हळूहळू शेकडो महिलांनी या कामात सहभाग घेतला. त्या घरगुती कार्यक्रमात, सणसमारंभात आणि शाळांमध्ये हर्गिला संवर्धनाचे संदेश देऊ लागल्या. पूर्णिमा यांनी पक्षीनिरीक्षक, वनखात्याचे अधिकारी आणि स्वयंसेवी संस्था यांनाही या कामाशी जोडून घेतले आणि वैज्ञानिकदृष्ट्या पद्धतशीर काम पुढे नेले. त्यांच्या कामामुळे हजारो पक्ष्यांची घरटी वाचली आणि त्यांची संख्या वाढण्यास मदत झाली.त्यांच्या या उल्लेखनीय योगदानासाठी त्यांना २०१७ मध्ये व्हिटले अवॉर्ड आणि २०२२ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाचा चॅम्पियन्स ऑफ द अर्थ हा पुरस्कार देण्यात आला. त्या आजही हर्गिला पक्ष्यांच्या संवर्धनाबरोबरच पर्यावरण-जागरुकता आणि महिलांच्या आर्थिक सशक्तीकरणाचं कार्य करत आहेत. त्यांच्या पुढाकारामुळे जंगल, पक्षी आणि गावकऱ्यांमधला संवाद अधिक सुरक्षित झाला आहे. आजही पूर्णिमा देवी बर्मन ग्रामीण महिलांचे प्रेरणास्थान आहेत आणि भारतातील प्राणीसंवर्धन क्षेत्रातील अत्यंत महत्त्वाच्या व्यक्ती आहेत.



## वैयक्तिक ओळख - स्व अभिव्यक्ती

पूर्ण वेळ गृहिणी असणे खरे तर अतिशय महत्वाचे आहे. घर आणि घरातली माणसे यांना आपला पूर्ण वेळ देणे ही गोष्ट सोपी नव्हे. पण आजही काही करणे म्हणजे पैसे मिळवून आणणे, असे समजले जाते. त्यामुळे गृहिणी मी काही करत नाही असे समजतात. खरे तर, घरातील जबाबदाऱ्या, इतरांच्या अपेक्षा आणि सततचे काम यामुळे त्यांची वैयक्तिक ओळख अनेकदा झाकोळली जाते.

स्वतःची अभिव्यक्ती ही कोणत्याही स्त्रीच्या आत्मविश्वासासाठी सर्वात नैसर्गिक आणि प्रभावी मार्ग आहे.

स्किल डेव्हलपमेंट

विशेषतः गृहिणींसाठी. अशावेळी विचार, भावना, कल्पना किंवा गुण एखाद्या कृतीतून व्यक्त करण्याची संधी मिळाली की तिच्यात दडलेली ताकद पुन्हा उघड होते. अभिव्यक्तीसाठी फार मोठ्या गोष्टींची गरज नसते. कथा किंवा डायरी लिहिणे, कविता रचणे, चित्रकला, शिवणकाम, पाककला, सजावट, बागकाम, हस्तकला, व्हिडिओ कंटेंट, मेहेंदी, नृत्य किंवा ऑनलाइन पोस्ट हीसुद्धा प्रभावी माध्यमे ठरू शकतात.

अभिव्यक्तीमुळे भावनांना दिशा मिळते. राग, ताण, खिन्नता किंवा आनंद व्यक्त करण्याचे साधन मिळाले की मन हलके होते आणि स्वतःची क्षमता जाणवते. एखादे काम पूर्ण झाल्यावर मी हे करू शकते याचा आनंद आणि अभिमान आत्मविश्वास देणारा ठरतो. कुटुंब, मैत्रिणी किंवा सोशल मीडियावरून कौतुक मिळते, तेव्हा आत्मसन्मान वाढतो आणि स्वतःवरचा विश्वास दृढ होतो. स्वतःच्या आवडी ओळखून त्या जोपासण्याची सवय लागते. स्व अभिव्यक्तीमुळे स्वतःला व्यक्त करणारी गृहिणी जीवनातील छोट्या-छोट्या गोष्टीतून आत्मविश्वास वाढवते आणि आपली ओळख नव्याने घडवते.



## स्कीन केअर

### हात कोरडे झालेत?

विविध आजार दूर ठेवण्यासाठी सतत हात धुवावे लागतात. यामुळे हातांची त्वचा कोरडी, निस्तेज दिसू लागते. हात रखरखीत होतात. तुमचे हातही कोरडे झाले असतील तर राईचं तेल जवळ बाळगा. हात धुवून पुसल्यानंतर कोरड्या भागावर राईचं तेल लावा. यामुळे त्वचेचा कोरडेपणा दूर होईल. राईचं तेल चिकट असल्यामुळे रोमछिद्रांमधून आत शिरतं आणि त्वचेला ओलावा देतं. हा ओलावा बराच काळ टिकून राहतो. त्यामुळे सतत हात धुणं किंवा इतर कारणामुळे हातांची त्वचा कोरडी झाली असेल तर राईच्या तेलाची बाटली वॉश बेसिनजवळ ठेऊन द्या.



## हेअर केअर

### प्रभावी हेअर पॅक

केसांचं गळणं थांबवण्यासाठी कांद्याचा रस वापरण्याचा सल्ला दिला जातो. हा रस इतर घटकांसोबत मिसळून लावता येईल. कांद्याचा रस आणि अंडं यांचा पॅक केस गळणं थांबवू शकतो. अंड्यामध्ये प्रथिनं भरपूर प्रमाणात असतात. अंड्यामध्ये दोन चमचे कांद्याचा रस आणि इसेन्शियल ऑईल घालून मिश्रण तयार करा. हे मिश्रण केसांना लावा. साधारण २० मिनिटांनी केस धुवून टाका. हा उपाय नियमित केल्यास केसांच्या समस्या दूर व्हायला मदत होईल.



## मेक अप



### वापर लिप लायनरचा

ओठांचं सौंदर्य खुलवण्यासाठी लिपस्टिकचा वापर होतो. पण फक्त लिपस्टिक लावणं पुरेसं नाही. तुम्ही लिप लायनरही वापरायला हवा. लिप लायनरचा वापर फक्त आउटलाईनसाठी केला जातो. पण प्रत्यक्षात लिप लायनर संपूर्ण ओठांवर लावायला हवा. यामुळे तुमच्या ओठांचा टोन सुधारेल तसंच वरच्या आणि खालच्या ओठांचा रंगही सारखा दिसेल. लिप लायनरमुळे उन्हाळ्यात लिपस्टिक खराब होण्याची समस्याही दूर होईल.

## कसे करावे चार्जिंग ?

टेक्नो टिप्स

मोबाईल, लॅपटॉप, टॅबलेट किंवा बहुतेक सगळी स्मार्ट गॅजेट्स आपल्याला नेहमीच वापरावी लागतात. या प्रत्येक डिजिटल साधनाला बॅटरी असते आणि त्यामुळे चार्जिंगची आवश्यकताही असते. त्यामुळे बॅटरीची काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे. अनेक लोक मोबाईल रात्रभर चार्जरवर लावून ठेवतात किंवा बॅटरी पूर्ण शून्यावर येईपर्यंत वाट पाहतात. पण त्यामुळे बॅटरीच्या आयुष्याला हानी पोचते. बॅटरी २०% ते ८०% दरम्यान चार्ज ठेवली तर दीर्घकाळ टिकते. कमी दर्जाचे चार्जर बॅटरीला हानी पोचवू शकतात त्यामुळे मूळ किंवा अधिकृत चार्जर वापरावा.



अधून मधून सेटिंग्जमधील बॅटरी बचत मोड वापरावा. अ‍ॅन्ड्रॉइडमध्ये बॅटरी सेव्हर मोड, आणि आयफोनमध्ये लो पॉवर मोड सुरू केल्यास बॅकग्राऊंडमधले अनावश्यक अ‍ॅप्स बंद होतात. अपडेट्स कमीत कमी होतात आणि स्क्रिनवरचा उर्जा वापर कमी होतो.

स्क्रिन ब्राइटनेस आणि कनेक्टिव्हिटीही बॅटरीवर परिणाम करतात. सतत फुल ब्राइटनेस वापरणे, ब्लू टूथ किंवा जीपीएस सतत चालू ठेवणे, यामुळे बॅटरी लवकर संपते. ऑटोब्राइटनेस किंवा अ‍ॅडाप्टिव्ह ब्राइटनेस वापरल्यास स्क्रिन आपोआप योग्य प्रमाणात प्रकाश कमी-जास्त करतो. त्यामुळे ऊर्जा वाचते. मोबाइलमध्ये बॅकग्राऊंड अ‍ॅप्स चालू असतील तरीही बॅटरी लवकर खर्च होते.सेटिंग-बॅटरी युसेजमध्ये जाऊन कोणती अ‍ॅप्स जास्त बॅटरी खातात ते पाहून अनावश्यक अ‍ॅप्स बंद किंवा अनइन्स्टॉल करावेत. त्यामुळे वारंवार चार्जिंगची गरज भासणार नाही.

## शांत झोपेसाठी...



डाएट अँड न्यूट्रिशन

उत्तम आरोग्यासाठी सात ते नऊ तासांची शांत झोप गरजेची आहे. पण रोजची धावपळ, ताणतणाव तसंच इतर कारणांमुळे झोपेचं खोबरं होतं. नीट झोप मिळाली नाही तर चिडचिड, डोकेदुखी अस्वस्थता अशा समस्या निर्माण होतात. निद्रानाश किंवा नैराश्यामुळे झोप येत नसेल तर डॉक्टरांचा सल्ला घेणं योग्य ठरतं. पण सदोष जीवनशैली, चुकीचा आहार यामुळे झोप येत नसेल तर तुम्ही काही पदार्थांचं सेवन करू शकता. यामुळे तुम्हाला शांत झोप लागू शकते.

- बदामाच्या सेवनामुळे झोपेचा दर्जा सुधारतो. रात्री झोपण्याआधी किंवा दिवसभरात कधीही थोडे बदाम खा. बदामांमुळे झोपेशी संबधित हार्मोन्सना चालना मिळते आणि तुम्ही शांत झोपू शकता. यातल्या मॅग्नेशियममुळे झोपेचा दर्जा सुधारतो. यातल्या ट्रिप्टोफॅन नामक घटकामुळे मेंदू आणि नसांना आराम मिळतो.
- केळ्यातल्या मॅग्नेशियम आणि पोटॅशियममुळे स्नायू मोकळे होतात. झोपेशी संबंधित समस्या असतील तर दररोज एक किंवा दोन केळी खा. यातही ट्रिप्टोफॅन नामक घटक असतो.
- कॅमोमाईल चहा हा सुद्धा चांगला पर्याय आहे. थोडं पाणी गरम करून त्यात कॅमोमाईल चहा घाला आणि प्या. यातल्या अँटीऑक्सिडंट्समुळे मेंदूला झोपेचा संदेश जातो आणि शांत झोप लागते. हा चहा पिऊन झोपताना शांत संगीत ऐका. काही मिनिटांमध्ये तुम्ही झोपून जाल.
- हळद आणि केशर घातलेलं दूध प्यायल्यामुळे आराम मिळू शकातो.
- रात्रीच्या जेवणात ओट्स घेता येतील. यात गुंतागुंतीची कर्बोदकं असतात. या कर्बोदकांमुळे तुम्ही झोपेच्या अधीन होता. ओट्स हा मेलाटोनिनचा नैसर्गिक स्रोत आहे.

## किचन टिप्स

### फॉर परफेक्ट बेकिंग

वाढदिवस किंवा इतर प्रसंगी केक कापला जातो. घरी केलेल्या केकची मजा काही औरच असते. तुम्हीही घरी केक करत असाल तर या बेकिंग टिप्स उपयोगी पडतील. केक बनवण्यासाठी योग्य पीठ वापरायला हवं. प्रत्येक पिठात थोड्याफार प्रमाणात ग्लुटन असतं. या ग्लुटनच्या प्रमाणानुसार केकचं टेक्स्चर ठरतं. तुम्हाला हलका आणि स्पंजी केक बनवायचा असेल तर मैदा वापरा अन्यथा ब्रेड फ्लोरचा वापर करा. केक बेक करताना ताजे पदार्थ वापरा. जुना बेकिंग सोडा किंवा पावडर वापरू नका. सर्व घटकांचं योग्य प्रमाण आणि ओव्हनचं तापमानही केक बेकिंगमध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात.



## त्वचेला तजेला देणारे नैसर्गिक क्लिंजर्स

ब्युटी टॉक

विविध क्लिंजर्स, मेक अप उत्पादनांमध्ये घातक रसायनं असतात. या रसायनांमुळे त्वचेचं नुकसान होतं. हे टाळण्यासाठी तुम्ही घरी उपलब्ध असणाऱ्या नैसर्गिक घटकांपासून क्लिंजर्स बनवू शकता.

- त्वचा कोरडी असणाऱ्यांनी लिंबू आणि संत्र्याच्या सालीचा वापर करून क्लिंजर बनवावं. संत्रं आणि लिंबाच्या सालीतल्या घटकांमुळे त्वचेची रोमछिद्रं स्वच्छ होतील. हे मिश्रण तयार करण्यासाठी दहा चमचे बदाम तेल, दहा चमचे ऑलिव्ह ऑईल आणि पाच चमचे लिंबाचा रस हे साहित्य घ्या. हे मिश्रण एका बाटलीत भरून ठेवा. आता संत्र्याची सालं वाळवून पूड करून घ्या. तुम्ही बाजारात मिळणारी पावडरही वापरू शकता. चमचाभर संत्र्याची पूड घ्या. त्यात हे मिश्रण घाला आणि चेहऱ्याला मसाज करा. यामुळे तुमचा चेहरा स्वच्छ होऊन जाईल.
- टोमॅटो हा नैसर्गिक क्लिंजर आहे. मुलायम आणि तजेलदार त्वचेसाठी अर्धा टोमॅटो चेहऱ्यावर घासा किंवा टोमॅटोचा रस चेहऱ्याला लावा. वाळल्यावर धुवून टाका. यामुळे त्वचेतली रोमछिद्रं खुली होतील.
- दह्यामुळे त्वचेचं आरोग्य राखलं जातं. रात्री दोन चमचे दह्याने चेहऱ्याला मसाज करा. वाळल्यावर धुवून टाका. चेहरा तजेलदार दिसेल.
- तुमच्या चेहऱ्याचा काही भाग कोरडा आणि काही भाग तेलकट असेल तर पपईचा वापर करा. दोन चमचे दुधात पपईचा गर मिसळा. त्यात ओटमील घाला. हे मिश्रण चेहरा आणि मानेवर लावा. यामुळे चेहरा आणि मानेचा काळपटपणा दूर होईल.
- तेलकट त्वचेवर मुलतानी माती खूप प्रभावी ठरते. त्यामुळे मुलतानी मातीचा पॅक तयार करून त्वचेवर लावा. दोन चमचे मुलतानी मातीत चिमूटभर कापूर पावडर आणि थोडं पाणी घाला. हे मिश्रण चेहऱ्यावर लावा. वाळल्यावर धुवून टाका.





## गरोदरपणातला स्टायलिश अंदाज

स्टाईल स्टेटमेंट

मैत्रिणींनो, सध्याच्या काळात गरोदरपण साजरं केलं जातं. विविध क्षेत्रातल्या सेलिब्रिटीज हा काळ एंजॉय करताना दिसतात. गरोदरपण हे ओझं न मानता मस्तपैकी मिरवून घेतात. छान छान कपडे घालतात, फॅशन करतात. करीना कपूरपासून समीरा रेड्डीपर्यंत अनेकींनी गरोदरपणात खूप धमाल केली, लोकांसमोर आल्या. त्यांच्याकडून आपणही प्रेरणा घेऊ शकतो. या दिवसात आनंदी, उत्साही राहणं गरजेचं असतं. मनात सकारात्मक विचार यायला हवेत. म्हणूनच तुम्ही वेगवेगळी फॅशन करू शकता. वेगवेगळ्या प्रकारचे कपडे घालून स्वत:चा उत्साह वाढवू शकता. या दिवसात कोणती फॅशन करायला हवी? जाणून घेऊ.

- गरोदरपणात पोट आणि वजन वाढतं. त्यामुळे या दिवसात खरेदी केलेले कपडे नंतर बाद होतात. हे टाळण्यासाठी तुम्ही रॅप ड्रेसेस खरेदी करा. रॅप ड्रेसेस स्ट्रेचेबल आणि अ‍ॅडजस्टेबल असतात. त्यामुळे प्रसूतीनंतर वजन कमी झालं तरी तुम्ही ते वापरू शकता. रॅप टॉप्सही मिळतात. तुम्ही हे टॉप्सही वापरू शकता.
- या दिवसात फ्लोरल प्रिंट कॅरी करता येईल. उन्हाळ्यात फ्लोरल प्रिंटची चलती असते. फ्लोरल प्रिंटवाले मॅक्सी ड्रेस, लाँग स्कर्ट, फ्रॉक्स घालता येतील. हे ढगळ कपडे आरामदायीही असतात. कॉटन मटेरियलचे कपडे खरेदी करा. कॉटनवर फ्लोरल प्रिंट उठून दिसतात.
- तुमच्याकडे वन पीसचा पर्यायही आहे. वेगवेगळ्या डिझाइन्सचे, स्टाईल्सचे वन पीस कॅरी करता येतील.
- आरामदायी आणि ट्रेंडी लूकसाठी टँक ड्रेसेसही ट्राय करता येतील. ट्रँक ड्रेस आरामदायी असतात. त्यामुळे हे कपडे गरोदरपणात घालता येतील. हे ड्रेस कुठेही कॅरी करता येतील.



## लागवड टोमॅटोची

परसबाग

मैत्रिणींनो, लालचुटुक टोमॅटो पदार्थांची, भाजीची चव वाढवतात. टोमॅटोच्या पिकावर घातक किटकनाशकांची फवारणी होते. त्यामुळे हे टोमॅटो वापरण्याआधी स्वच्छ धुवावे लागतात. ही घातक रसायनं पोटात जाऊन अपाय होऊ नये असं वाटत असेल तर तुम्ही घरीच कुंडीत टोमॅटोची लागवड करू शकता. घरच्या कुंडीतले टोमॅटो खाताना खूप गंमत वाटेल. तुम्हाला बागकामाची आवड असेल तर फावल्या वेळेत टोमॅटोची लागवड करता येईल. टोमॅटो उष्णकटीबंधीय रोप आहे. भारतातल्या उष्ण वातावरणात याची चांगली वाढ होईल. टोमॅटोची लागवड करण्यासाठी बिया लागतील. या बिया नर्सरीतून खरेदी करता येतील. त्यासाठी घरातला टोमॅटो घ्या. त्याचे चार तुकडे करा. तुम्ही लागवडीसाठी तयार केलेल्या कुंडीतल्या मातीत टोमॅटोचे तुकडे पेरा. टोमॅटोचे तुकडे साधारण मातीच्या अर्धा इंच आत पेरा. आता अंकुर फुटायला साधारण तीन ते चार आठवड्यांचा काळ लागेल. यानंतर रोपाला नीट पाणी घालत रहा. सेंद्रिय खत वापरा. टोमॅटोचं रोपटं उंच होतं. त्यामुळे त्याला वाढीसाठी आधार लागेल. तसंच हे रोपटं थंड वातावरणात ठेऊ नका. थंडीत रोपटं घरात ठेवा. या रोपट्याला बारा महिने टोमॅटो लागतील.

# महाराष्ट्र 'राजभवन झाले आता लोकभवन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३ :

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार महाराष्ट्र राजभवनचे नाव आता अधिकृतपणे महाराष्ट्र लोकभवन असे करण्यात आले आहे. महाराष्ट्र व गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी या संदर्भात राजभवन सचिवालयाला निर्देश दिले आहेत.

राजभवन अधिक लोकाभिमुख, पारदर्शक आणि लोक कल्याणासाठी समर्पित करण्याच्या उद्देशाने हा निर्णय दिशादर्शक आहे, असे राज्यपालांनी लोकभवन म्हणून ओळखले जाणारे राज भवन आता केवळ राज्यपालांचे निवासस्थान व कार्यालय न राहता,




राज्यातील नागरिक, समाजातील विविध घटक, विद्यार्थी, संशोधक, शेतकरी आणि नागरी संघटनांशी संवाद व सहभाग यांचे एक केंद्र व्हावे अशी अपेक्षा राज्यपालांनी व्यक्त केली.

'लोकभवन' हे सरकार आणि राज्यातील जनतेमध्ये सेवा, सहकार्य व संवादाचा सेतू व्हावे, हीच या नामांतरामागची भूमिका आहे, असे त्यांनी सांगितले.

'लोकभवन' केवळ संवैधानिक कर्तव्यांपुरते मर्यादित न राहता, समाजाच्या आशा, आकांक्षा आणि समस्यांप्रति संवेदनशील राहून लोकभवन असेल असे राज्यपालांनी स्पष्ट केले.

## नगरपालिकांच्या निवडणुकीचा
# महायुतीवर परिणाम नाही

### आयोगाने निकाल पुढे ढकलणे चुकीचे : चंद्रशेखर बावनकुळे

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २ :

राज्यात झालेल्या नगरपालिकांच्या निवडणुकीचा महायुतीवर काहीही परिणाम होणार नाही. राज्यातील महायुती आणि एनडीए हे एकसंघपणे काम करत आहे. लोकल निवडणुकीचा काहीही परिणाम महायुतीच्या समन्वयावर पडणार नाही, असे भाजपचे मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले आहे.



बावनकुळे म्हणाले की, निवडणूक पुढे ढकलण्याची निवडणूक आयोगाची भूमिका चुकीची होती. त्यांनी निवडणूक पुढे ढकलायला नको होती. यासंदर्भात आम्ही त्यांना ४ वेळा पत्र लिहून निवडणूक पुढे ढकलू नका अशी विनंती केली होती.

बावनकुळे म्हणाले की, निवडणूक रद्द करणे, पुढे ढकलणे हे जे काही राज्यात सुरू आहे यावर आम्ही निवडणूक आयोगाशी रोजच संवाद साधत आहोत. आयोगाला आम्ही निवडणूक पुढे ढकलू नका यासाठी 4 पत्रही पाठवले आहे. आता नाना पटोले यांना सर्वच गोष्टीमध्ये राजकारण करायचे आहे तर ती वेगळी गोष्ट आहे. आम्ही सर्वच लोक संतप्त आहोत. राज्य निवडणूक आयोगाच्या भूमिकेशी आम्ही असमर्थ आहोत. ही भूमिका आम्ही स्पष्ट केली आहे, या संदर्भात आम्ही आयोगाला पत्र देखील दिले आहे.

अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईसाठी राज्य सरकारने केंद्र सरकारला प्रस्ताव पाठवला आहे.त्यानंतर केंद्रीय पथक येते आणि ते अंतिम करते. शेवटी लोकसभेच्या उत्तरामध्ये हेच आले असेल की अंतिम मदतीचा गोषवारा या नियोजित ठिकाणी गेला नसेल.राज्य आणि केंद्र सरकारचा ताळमेळ अजून बसवून अंतिम मदतीला गेला नसेल.आज राज्य आणि केंद्र सरकारची पाहणी झाली आहे. त्यामुळे आता मदतीसंदर्भात अंतिम प्रस्ताव जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

बावनकुळे म्हणाले की, अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची पाहणी करता केंद्र सरकारचे पथक राज्यात आले होते त्यांनी संपूर्ण नुकसानीची पाहणी केली. आता राज्याचे आणि केंद्राचे सर्वेक्षणाचे जे काही रिपोर्ट आहेत ते एकत्रितपणे केंद्राकडे जातात आणि यानंतर केंद्र सरकार मदत देते. जेवढे नुकसान झाले तेवढी संपूर्ण मागणी राज्य सरकारकडून केली जाते मग केंद्र सरकार एनडीआरएफच्या निकषाप्रमाणे राज्याला मदत देतात. महाराष्ट्राला केंद्र सरकारकडून चांगल्या पद्धतीने मदत मिळणार आहे.

# चैत्यभूमीवर कडेकोट सुरक्षा!

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :

महापरिनिर्वाण दिनासाठी देशभरातून लाखो अनुयायी मुंबईत दाखल होणार आहेत आणि यंदा चैत्यभूमी परिसरात अभूतपूर्व सुरक्षाव्यवस्था आणि सेवासुविधा लागू होणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज घेतलेल्या उच्चस्तरीय आढावा बैठकीत याबाबत मोठे निर्देश देत सुरक्षा आणि सोयीतील कोणतीही उणीव सहन केली जाणार नाही, असा स्पष्ट इशाराच दिला.

चैत्यभूमीला वर्षानुवर्षे येणाऱ्या गर्दीचा विचार करता प्रशासनाचा ताण वाढणार असला तरी यंदा काही महत्त्वाचे आणि ऐतिहासिक निर्णय घेण्यात आले आहेत. विशेषतः इंदू मिल येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासंदर्भात समन्वय समिती स्थापन करण्याचा निर्णय ही बैठकीतील सर्वात महत्त्वाची घोषणा ठरली. विविध स्तरांतून आलेल्या सूचना, आक्षेप आणि मागण्यांच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय महत्त्वपूर्ण मानला जात आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजाला ज्ञान दिले आणि जागरूक केले याची आठवण करून देताना, ही जागरूकता अधिक बळकट करण्यासाठी महापरिनिर्वाण दिनाचे आयोजन हे आपले कर्तव्य आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

सामाजिक न्याय राज्यमंत्री माधुरी मिसाळ, माजी मंत्री विजय गिरकर, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, मुंबई पोलिस आयुक्त देवेन भारती, मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी, कोकण आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव ब्रिजेश सिंह यांच्यासह विविध विभागांचे सचिव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन समन्वय समितीचे सरचिटणीस नागसेन कांबळे तसेच अनेक संघटनांच्या प्रतिनिधींनीही सहभाग घेतला.

चैत्यभूमी परिसरात वॉटरप्रूफ मंडप, स्वच्छतागृहे, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता वाढवावी, दादर व आसपासच्या परिसरात वाहतूक नियंत्रणासाठी विशेष पोलिस तैनात करावेत, मार्गदर्शनासाठी ठिकठिकाणी सूचना फलक, बेस्टकडून अतिरिक्त बससेवा, सीसीटीव्ही कॅमेरांसह संपूर्ण परिसराचे व्हिज्युअल मॉनिटरिंग, आरोग्य, भोजन, निवारा, वाहतूक यासह सर्व यंत्रणांची समन्वयित तयारी करण्यात यावी, असे स्पष्ट निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले.

दरवर्षी उघडकीस येणाऱ्या उणीवांचे पुनरावलोकन करून यंदा एकही त्रुटी राहणार नाही यावर जोर देण्यात आला. हजारो स्वयंसेवक, अनेक विभाग आणि सुरक्षा यंत्रणेचा सुसंघटित ताफा कार्यरत असणार आहे.

यावेळी महापरिनिर्वाण दिनानिमित्त तयार करण्यात आलेल्या पोस्टरचे अनावरण आणि माहिती पुस्तिकेचे प्रकाशनही मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले.

अतोनात गर्दीची सावट, सुरक्षा तपासण्या, नव्याने येणाऱ्या सेवासुविधा आणि यावर्षी होणाऱ्या विशेष व्यवस्थेमुळे महापरिनिर्वाण दिनाचे यंदाचे आयोजन अधिकच लक्षवेधी ठरणार आहे.

फडणवीसांच्या या कडक सुचनांनंतर यंदाचा महापरिनिर्वाण दिन नेमका किती बदलणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# पुलगाव दारूगोळा भंडारात बॉम्बचा स्फोट : १ ठार

■ महासागर प्रतिनिधी, वर्धा, दि. ३ :

पुलगाव येथील दारूगोळा भंडारातील कालबाह्य बॉम्ब निकामी करण्याचे काम ठराविक काळाने होत असते. त्याची दवंडी पण पिटल्या जात असते. ही माहिती होताच असंख्य लोकं त्याकडे धाव घेत असतात.

मात्र त्यातच एक घटना आज घडली आहे. या स्फोटात केळापूर येथील संदीप भालाजी तुमडाम या ४० वर्षीय युवकाचा मृत्यू झाला. आज सकाळची ही घटना असून यामुळे परिसरात शोककळा पसरली आहे. देवळी पोलीस घटनास्थळी पोहचली असून युवकाचे शव विच्छेदन करण्यास नेण्यात आले आहे.

पुलगाव दारूगोळा भंडारात बॉम्ब साठा असतो. कालांतराने ते निकामी केल्या जातात. निकामी बॉम्बचे तुकडे वेचण्यासाठी परिसरातील काही गावातील लोकं धाव घेत असतात. निकामी बॉम्ब खड्डे करीत पुरल्या जातात आणि तिथेच ते स्फोट करीत उडवून देतात.

या भंगार झालेल्या साहित्यातून जस्त, लोखंड व अन्य धातूचे तुकडे वेचण्यासाठी झुंबड उडते. हे तुकडे काही ठेकेदार विकत घेतात. कधी कधी हे काम जीवावर बेतते. तसाच आज हा प्रकार घडला. २०२३ मध्ये पण योगेश केशव नेरकर या शेतमजूरचा अशाच घटनेत मृत्यू झाला होता. याप्रकरणी तपास सुरू आहे.

## मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानासाठी जिल्हा परिषदांच्या
# स्वनिधीतून १० टक्के निधी राखीव

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :

पंचायत राज संस्थांची कार्यक्षमता वाढविणे आणि विकास योजनांची जलद अंमलबजावणी करण्याच्या उद्देशाने ग्रामविकास विभागामार्फत राज्यात सन २०२५-२६ पासून मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान राबविण्यात येत आहे.

या अभियानांतर्गत ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद यांच्या कामगिरीच्या आधारे तालुका, जिल्हा, महसूल विभाग व राज्य स्तरावर मूल्यमापन करून पुरस्कार देण्यात येणार आहेत.

या योजनेचे स्वरुप स्पर्धात्मक असल्यामुळे या अभियानाच्या पूर्वतयारीसाठी जिल्हा परिषदांना आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याकरिता जिल्हा परिषदांच्या स्वनिधीतून दरवर्षी किमान १० टक्के निधी या अभियानासाठी राखीव ठेवण्यास ग्राम विकास व पंचायत राज विभागाच्या ४ नोव्हेंबर २०२५ रोजीच्या शासननिर्णयान्वये मान्यता दिली आहे.

अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक असलेल्या प्रशासकीय आणि प्रचारात्मक खचार्साठी जिल्हा परिषदांना स्वनिधी (सेस फंड) अपुरा ठरत असल्याने, जिल्हा परिषदांच्या स्वनिधीतून दरवर्षी किमान १० टक्के निधी या अभियानासाठी राखीव ठेवण्यास या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात आली आहे.

शासन निर्णयानुसार, संबंधित जिल्हा परिषदांनी हा निधी अभियानातील घटकांसाठी प्राप्त प्रस्तावांनुसार आणि शासनाने दिलेल्या वेळापत्रकातच खर्च करणे अनिवार्य राहणार आहे. अधिक पारदर्शकता आणि प्रभावी नियोजनासाठी क्षमता बांधणी, प्रशिक्षण, कार्यशाळा, यशोगाथा फिल्म, मेळावे आणि तांत्रिक सहाय्य इत्यादींसाठी या निधीचा वापर करण्यात येणार असल्याचे शासनाने जारी केलेल्या परिपत्रकात नमूद केले आहे.

## तृतीयपंथी लेखिकेला पहिल्यांदाच
# इन्स्पायर साहित्य फेलोशिप जाहीर

■ महासागर प्रतिनिधी
चंद्रपूर, दि. ३ :

उच्चशिक्षीत विजेंद्र टेंभुर्णे यांची निवड



यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबईच्या वतीने दिली जाणारी प्रतिष्ठित शरद पवार इन्स्पायर साहित्य फेलोशिप यंदा चंद्रपूरची तृतीयपंथी कार्यकर्ती व लेखिका विजेंद्र टेंभुर्णे यांना जाहीर झाली आहे.

१ लाख रुपये रक्कमेची ही फेलोशिप विजेंद्र टेंभुर्णे यांना पुस्तक लेखनासाठी प्राप्त झाली असून त्याच्यातली मी हे तिचे आत्मकथन यातून प्रकाशित होणार आहे. १४ डिसेंबरला मुंबई येथे शरद पवार यांच्या हस्ते ही फेलोशिप प्रदान करण्यात येणार आहे.

२०२१ पासून सुरू असलेल्या या फेलोशिपला राज्यातील युवा लेखकांमध्ये मोठे महत्त्व आहे. विशेष म्हणजे या फेलोशिपसाठी पहिल्यांदाच तृतीयपंथी लेखिकेची निवड झाली आहे. चंद्रपुरातील दुर्गापूर भागात राहणारी विजेंद्र यांनी मराठी व समाजशास्त्र विषयात पदव्युत्तर शिक्षण घेतले आहे.

ती यूजीसी नेट परीक्षाही उत्तीर्ण असून मराठी विषयात पीएच.डी. करत आहे. अत्यंत हलाकीच्या आर्थिक परिस्थितीत शिक्षण घेऊन त्यांनी स्वतःची ओळख निर्माण केली.

तृतीयपंथी ओळख स्वीकारल्यानंतर त्यांच्या वैयक्तिक आयुष्यात, कौटुंबिक पातळीवर आणि सामाजिक जीवनात अनेक अडथळे निर्माण झाले. विखारी टीका, तिरस्कार, मानसिक दडपण आणि असुरक्षितता या सगळ्यावर मात करत त्यांनी शिक्षण, लेखन आणि सामाजिक कार्याची वाट कधीही सोडली नाही.

विजेंद्र यांनी चंद्रपुरातील समाजकार्य महाविद्यालयात तासिका तत्वावर सहाय्यक प्राध्यापक म्हणून काम केले आहे. त्या स्वयंप्रेरणेतून टेलरिंगचे काम शिकल्या व निशा फॅशन ब्युटीक सेंटर उभारून आता आत्मनिर्भर झाल्या आहे. राज्यभरातील साहित्यिक, सामाजिक व तृतीयपंथी समुदायातून त्यांच्या या निवडीबद्दल अभिनंदन होत आहे.

# एकल समितीचा हजारो महिलांना आधार



कोरोना संकटाच्या दोन वर्षांच्या काळात पतींच्या निधनाने अंदाजे ८० हजार महिला एकल झाल्या. या महिलांना आधार देण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते हेरंब कुलकर्णी यांच्या प्रयत्नांतून सुरू झालेल्या कोरोना एकल महिला पुनर्वसन समितीच्या पुढाकारातून साधारणपणे ४० हजारांपेक्षा अधिक महिलांना संकटकाळात आधार मिळाला आहे.

आतापर्यंत एकल महिलांच्या मुलांसाठीच्या योजनेतील रकमेत वाढ झाली. दीडशेपेक्षा अधिक महिलांना रोजगाराचे साधन मोफत उपलब्ध करून दिले. बचतगटांत सहभागासह पाच महिलांना नवीन बचतगट करता येईल, या बाबतचा अध्यादेश निघाला. मुलांनाही आर्थिक आधार मिळाला आहे. या महिलांत बहुतांश ग्रामीण भागातील, शेतकरी कुटुंबांतील महिलांचा समावेश आहे.

राज्यात कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत मोठ्या प्रमाणात मृत्यू झाले. त्यात तरुणांचा अधिक समावेश होता. एकूण दीड लाख मृत्यूंपैकी ६० टक्के म्हणजे साधारण ८० हजार पुरुषांचा मृत्यू झाला. त्यात २२ टक्के महिला ५० वर्षे वयाच्या आतील आहेत. कोरोनाने एकल झालेल्या महिलांना एका संस्थेतर्फे आर्थिक मदत दिली जात होती.

त्याचे नगर जिल्ह्यातील अकोले तालुक्याचे काम सामाजिक कार्यकर्ते हेरंब कुलकर्णी यांच्याकडे होते. या निमित्ताने त्यांचे अशा महिलांशी थेट बोलणे होते होते. त्यातून एकल महिलांची वास्तवता समोर आली. त्यांना मदत करण्यासाठी समिती तयार करण्याची संकल्पना मांडून समाज माध्यमांवर आवाहन केले. त्यानुसार दोन दिवसांत राज्यभरातून सुमारे १९० संस्थांनी काम करण्याची तयारी दर्शवली.

लोकजागर

२५ जून २०२१ रोजी कोरोना एकल पुनर्वसन समिती करून राज्यातील विदर्भ, मराठवाड्यातील सर्व जिल्हे, नगर, नाशिक, जळगाव, नंदुरबार, धुळे, पुणे, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर आदी जिल्ह्यांत काम सुरू केले. सध्या ८१ जिल्ह्यांत १०० संस्थांचे प्रतिनिधी काम करत आहेत. महिला व बालकल्याण विभाग विधवा महिलांच्या मुलांसाठी असलेल्या बालसंगोपन योजनेतून ४५० रुपये प्रतिमहिना एका बालकांसाठी देत होते. समितीच्या पुढाकारातून ११०० रुपये व आता नवीन अर्थसंकल्पात २५०० रुपये झाले आहेत. दोन मुलांपर्यंत लाभ मिळू लागला आहे. एकट्या नगर जिल्ह्यात ६ हजार, तर राज्यातील ४२ हजार मुलांना हा लाभ मिळतो आहे. नगर जिल्ह्यात हनीफ शेख यांच्या पुढाकारातून समिती त्या-त्या तालुक्यांत जाऊन माहिती घेतेय.

राज्यात विविध संस्था, संघटना व वैयक्तिक मदतीतून महिलांना रोजगार उपलब्ध करून देणारी साधने मोफत उपलब्ध करून दिली जात आहे. आतापर्यंत १५० पेक्षा अधिक महिलांना शेळ्या, पिठाची गिरणी, शिलाई मशिन यासह इतर वेगवेगळी रोजगार देणारी सुमारे ४० लाखांच्या साहित्याचे वाटप केले आहे. कोरोना काळात पतीवर उपचार करणाऱ्या रुग्णालयांनी जास्तीचे बिल वसूल केल्याच्या १८०० महिलांनी आरोग्य विभागाकडे तक्रारी केल्या होत्या. त्यात तथ्य आढळलेल्या काही रुग्णालयांकडून सुमारे १० लाखांची वसुलीही समितीने करून दिली आहे. समितीच्या पुढाकारातून तरुणपणात आधार हरवलेल्या ८ महिलांचे विवाह झाले आहेत.

सध्या राज्यात नेमक्या किती महिला एकल आहेत. त्यांची काय परिस्थिती आहे, या बाबत माहिती नाही. त्यामुळे सर्वच एकल (विधवा) महिलांचे सर्वेक्षण करून त्यांच्यासाठी स्वतंत्र धोरण ठरवणे गरजेचे आहे. ■ ■ ■

# कोल्हापूरच्या मोनिकांनी शेतीत घडवली क्रांती



कोल्हापूरच्या मोनिका मोहिते यांनी शिक्षण आणि आधुनिक विचार यांचा मेळ साधून शेतीत क्रांती घडवली आहे. त्यांनी 'पारखी ऑर्गेनिक फार्म्स'च्या माध्यमातून नैसर्गिक शेती लाभदायक आणि टिकाऊ भविष्य आहे हे सिद्ध केले आहे. वर्षाला ५० लाख रुपयांचे उत्पन्न मिळवत त्यांनी स्वतःला एक यशस्वी उद्योजक म्हणून सिद्ध केले आहे.

मोनिका मोहिते या महाराष्ट्र राज्यातील कोल्हापूर येथील कृषी उद्यमी आहेत. मोनिका मोहिते यांनी इंग्रजी साहित्यात मास्टर्स डिग्री मिळवली आहे. त्यांच्याकडे कंप्यूटर सायन्समध्ये पोस्ट ग्रॅज्युएट डिग्री आणि क्रिएटिव्ह रायटिंगमध्ये डिप्लोमा देखील आहे. २००८ साली त्यांच्या मुलाने प्रोफेशनल रेसिंगमध्ये करिअर सुरू केले, तेव्हा त्याला एनर्जी बार आणि प्रोटीन सप्लीमेंटची गरज असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

बाजारामध्ये शुद्ध आणि पौष्टिक पदार्थ मिळत नसल्यामुळे मोनिका यांनी स्वतःच ते तयार करण्याचा निर्णय घेतला. अशाप्रकारे 'पारखी ऑर्गेनिक फार्म्स'ची सुरुवात झाली. या फार्मचे नाव त्यांनी त्यांच्या सासू पार्वती आणि मुलगी ख्याती यांच्या नावावरून ठेवले. कोणतेही औपचारिक प्रशिक्षण नसताना, मोनिकाने २०१० मध्ये आपल्या शेतीला सुरुवात केली. त्यांनी कार्यशाळांमध्ये भाग घेतला, तज्ज्ञांकडून सल्ला घेतला आणि अनुभवातून शिकल्या. भोपाळमधील आईसीएआर-सीआईएई मधील एका प्रशिक्षणात सोयाबीनचे पीठ इतर पिठांमध्ये योग्य प्रमाणात मिसळल्यास प्रोटीनची मात्रा वाढते हे त्यांना समजले. आज त्यांचे ४० एकरचे फार्म एक आत्मनिर्भर परिसंस्था बनले आहे.

तेथे विविध प्रकारची पिके, डाळी, पशुधन आणि कुक्कुटपालन एकत्रितपणे केले जाते. सोयाबीन, ऊस, तांदूळ, ज्वारी आणि डाळींसारखी पिके येथे घेतली जातात. मोनिका यांच्यासमोर सर्वात मोठे आव्हान म्हणजे इतर शेतकरी आणि मजुरांना जैविक शेती पद्धती स्वीकारण्यास राजी करणे होते.

सुरुवातीला लोकांना त्यांच्या खत आणि कीटकनाशकांच्या फायद्यांवर विश्वास नव्हता. गायीच्या शेणापासून धूप बनवण्याच्या त्यांच्या कल्पनेची लोकांनी खिल्ली उडवली. परंतु, मोनिका आपल्या निश्चयावर ठाम राहिल्या. कालांतराने, त्यांच्या कामाचे परिणाम दिसू लागल्यावर लोकांचा त्यांच्यावर विश्वास बसला. त्यांच्या मते, जैविक शेतीत शेतकऱ्यांसाठी योग्य भावाची कमतरता हे सर्वात मोठे आव्हान आहे. त्यामुळे, शेतकऱ्यांनी थेट ग्राहकांशी संपर्क साधावा यासाठी त्या प्रयत्नशील आहेत.

मोनिका मोहिते यांचे शिक्षण खूप व्यापक आहे. त्यांना स्वच्छ आणि नैसर्गिकरित्या पिकवलेल्या अन्नाने जगाला निरोगी बनवायचे आहे. मोनिका ग्लोबल फार्मर बिजनेस नेटवर्क (जीएफबीएन) च्या सदस्या आहेत. या नेटवर्कमुळे त्यांना इतर प्रगतीशील शेतकऱ्यांबरोबर ज्ञान आणि अनुभव वाटण्याची संधी मिळते. शेतकऱ्यांसाठी डिजिटल प्लॅटफॉर्म कृषी क्षेत्रात क्रांती घडवू शकतो, असे त्यांचे मत आहे. या प्लॅटफॉर्ममुळे शेतकरी आपले उत्पादन थेट ग्राहकांपर्यंत पोहोचवू शकतात. मोनिका मोहिते यांनी 'पारखी'च्या माध्यमातून प्रामाणिकपणा, टिकाऊपणा आणि काळजी यावर आधारित एक चळवळ उभी केली आहे. ■ ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

# मतदानाकडे मतदारांची पाठ



■ महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि. ३ :

जिल्ह्यातील १० पालिकांच्या अध्यक्ष आणि २५६ सदस्य पदासाठी झालेल्या निवडणुकीसाठी एकमेव अपवाद वगळता उत्साही मतदान झाले. मात्र मतदानाकडे तब्बल १लाख ३६ हजार ८४१ मतदारांनी पाठ फिरविली. दुसरीकडे बुलढाण्यात झालेले अल्प मतदान शासकीय यंत्रणासाठी चिंता अन चिंतनाची बाब ठरावी.

देऊळगाव राजा पालिका अध्यक्षसह संपूर्ण निवडणुकीला न्यायालयाने स्थगिती दिली. यामुळे काल १० पालिकासाठी मतदान पार पडले. प्रारंभीच्या ७.३० ते ९. ३० वाजे दरम्यानच्या पहिल्या टप्प्यात जिल्ह्यात जेमतेम ८ टक्के मतदान झाले. मतदानाला दोनच तास राहिले असतांना म्हणजे दुपारी ३. ३० वाजेपर्यंत ही टक्केवारी ४९ टक्के इतकीच असल्याने सर्वांच्याच मनात कमी मतदानरुपी शंकेची पाल चुकचूकली. मात्र बुलढाना वगळता इतर पालिकातील सर्वपक्षीय कार्यकर्ते आणि जवाबदार मतदारांनी या शंका व्यर्थ ठरविल्या. साडेतीन नंतर मतदानने कमालीची गती घेतली आणि अखेरच्या दोन तासात (बुलढाणा वगळता) नऊ पालिकात विक्रमी मतदान झाले.

# सांगलीत स्ट्राँग रूमबाहेर मोठा राडा

■ वृत्तसंस्था, सांगली, दि. ३ :

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने मतमोजणी २१ डिसेंबरपर्यंत पुढे ढकलली आहे. त्यातच सांगली जिल्ह्यातील आष्टा नगरपरिषदेसाठी झालेल्या निवडणुकीत मतदानात तब्बल २९०० मतांचा फरक आल्यामुळे मोठा राडा झाला आहे.

आष्टा नगरपरिषदेसाठी शहरात एकूण ३०,५७४ मतदार आहेत. त्यापैकी २२,८६४ मतदारांनी प्रत्यक्ष मतदान केले. पण आता प्रशासनाने काल दिलेली आकडेवारी व आता पोर्टलवर दिसणाऱ्या आकडेवारीत तब्बल २९०० मतांचा फरक दिसून येत आहे. पोर्टलवर एकूण मतसंख्या ३३,३२८दाखवण्यात आली आहे. दाखवण्यात आले आहे. आष्टा शहर विकास आघाडीच्या वैभव शिंदे यांनी स्ट्राँग रूमबाहेर निवडणूक अधिकाऱ्यांना याचा जाब विचारला. यातून पुढे राडा झाला.

# व्हॉईस ऑफ मीडियाच्यावतिने शूर सरदारांचा सत्कार

### सोलापूरात होणार प्रशिक्षण कार्यशाळा आणि दोन पुस्तकांचा प्रकाशन सोहळा

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :

व्हॉईस ऑफ मीडिया आणि व्ही.ओ.एम. इंटरनॅशनल फोरम या पत्रकारांच्या आंतराष्ट्रीय पत्रकार संघटनेच्या वतीने येत्या ५ डिसेंबर २०२५ रोजी सोलापूरमध्ये पंढरपूर अधिवेशन यशस्वी करणाऱ्या पदाधिकारी यांचा शूर सरदारांचा हृदय सत्कार, एक दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा आणि दोन पुस्तकांचा प्रकाशन सोहळा यांसह अनेक महत्त्वपूर्ण सत्राच्या सोहळ्याचे आयोजन केले आहे.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी १० वाजता दीपप्रज्वलनाने होईल. विचारवंत प्रवीणदादा गायकवाड, आ. श्रीकांत भारतीय, राणा सूर्यवंशी, रविंद्र चिंचोलकर आणि रविकांत तुपकर, व्यंकटेश जोशी यांची उपस्थिती असेल.

प्रदेशाध्यक्ष अनिल म्हस्के हे आगामी वर्षाचे उद्दिष्ट, पत्रकार हितासाठीच्या राज्यव्यापी उपक्रमांची दिशा आणि संघटन विस्तारासंबंधी महत्त्वपूर्ण विचार मांडतील. दिव्या भोसले, महासरचिटणीस, प्रशिक्षणामागची भूमिका आणि आंतराष्ट्रीय उपक्रम सांगणार आहेत. संदीप काळे यांच्या दोन महत्त्वाच्या पुस्तकांचा प्रकाशन सोहळा होणार आहे.

जगातल्या पत्रकारितेला लागलेली घरघर : एक चिंतन आणि उपाय (मराठी) आणि 'The Hoarseness of Global Journalism: A Reflection and a Call for Solutions' (English) ही पुस्तके प्रकाशित केली जातील. यानंतरचे विशेष आकर्षण म्हणजे व्हॉईस ऑफ मीडिया आणि व्ही.ओ.एम. इंटरनॅशनल फोरम जगातील १९५ देशांत जात आहोत – ते कसे? हे सादरीकरण. दिव्या भोसले, गोविंद जोशी, स्नेहल पाटील आणि अक्षय श्रीकंठवार हे आंतरराष्ट्रीय पदाधिकारी या विषयावर संयुक्तरीत्या सादरीकरण देणार आहेत. यातून संघटनेच्या जागतिक विस्ताराची रणनीती यात उलगडण्यात येणार आहे.

दिवसभरातील दोन महत्त्वाच्या मार्गदर्शन सत्रांमध्ये प्रवीणदादा गायकवाड संघटना वाढवून ती लोकाभिमुख कशी करायची? या विषयावर भाष्य करतील, तर आ. श्रीकांत भारतीय संघटना वाढीचे स्वप्न पाहणाऱ्यांची कवचकुंडले या विषयावर मार्गदर्शन करतील. दुपारनंतर रविकांत तुपकर लीड करणारा नेता कसा असावा? या विषयावर कार्यकर्त्यांना दिशा देतील आणि शिवाजी गावडे मी सक्रिय कसे राहायचे? या विषयावर संवाद साधतील.

दरम्यान महाराष्ट्र राज्याचा वार्षिक प्लॅन या विषयावर व्यापक चर्चा होणार आहे. अनिल म्हस्के, किशोर कारंजेकर, गोरक्षनाथ मदने आणि राज्यभरातून उपस्थित राहणारे सर्व सहभागी या चर्चेत भूमिका निभावतील.

संघटनेच्या आगामी योजनांची रूपरेषा, जिल्हास्तर ते राज्यस्तर संघटन बांधणी, पत्रकार संरक्षण आणि महिला पत्रकार सेल यांसारखे अनेक मुद्दे चर्चेत येणार आहेत.

याबाबत प्रदेशाध्यक्ष अनिल म्हस्के म्हणाले, ५ डिसेंबरचा कार्यक्रम हा व्हॉईस ऑफ मीडियाया महाराष्ट्रातील चळवळीला नवी दिशा देणारा असेल. पत्रकारांच्या सुरक्षेसाठी आणि संघटनेच्या जागतिक विस्तारासाठी हा दिवस अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.

सोलापूर येथील हॉटेल फन रेसिडेन्सी, होटगी रोड येथे सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत होणाऱ्या या दिवसभराच्या कार्यक्रमात व्हॉईस ऑफ मीडियाचे पदाधिकारी तसेच सर्व सदस्यांनी सहभागी व्हावे असे आवाहन व्हॉईस ऑफ मीडिया सोलापूर जिल्हाध्यक्ष बालाजी फुगारे, माऊली डांगे, तौफिक नदाफ, सूरज कौलगे आणि सोलापूरच्या सर्व पदाधिकारी यांनी केले आहे.